मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » मंगळवार, २९ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:१३१ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## ईडी कार्यालयातील सर्व कागदपत्रे सुरक्षित

मुंबई, दि. २७ प्रतिनिधी
मुंबईतील सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कार्यालयाला आग लागल्याची घटना घडली. यानंतर विरोधकांकडून यावरून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ही आग लागली की लावण्यात आली याबद्दल शंका उपस्थित केल्या जात आहेत. या आगीत महत्त्वाच्या प्रकरणांचे पुरावे गहाळ झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.दरम्यान आगीच्या या घटनेवरून विरोधक संशय व्यक्त करत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे की ईडीच्या कार्यालयाला आग लागली असली तरी तिथली कागदपत्रे सुरक्षित आहेत. ते म्हणाले की, “मी मुंबईतील ईडीच्या अधिकाऱ्यांशी बोललो त्यांनी मला सांगितलं आहे की कार्यालयातील प्रत्येक कागद सुरक्षित आहे. त्या कागदपत्रांचे मिरर इमेजिंग स्टोरेज देखील आहे. या आगीमुळे कार्यालयातील कुठल्याही कागदाला केसाचाहही धक्का लागलेला नाही,” अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

अग्राग्रलेख
खरीखरी

## पाकिस्तानातले भगोडे

भारताच्या नंदनवनात काही दिवसांपूर्वी निरपराध्यांच्या रक्ताचे पाट वाहिले गेले. ही कृत्ये करणाऱ्या अतिरेक्यांच्या पाठीशी शक्ती उभी करणाऱ्या पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांची लायकी काय आहे. ते दाखवणाऱ्या दोन बातम्या आमच्या समोर आलेल्या आहेत. एका बातमीत पाकिस्तानी लष्कराच्या जवळपास बाराशे बड्या बड्या अधिकाऱ्यांनी आपले राजीनामे दिलेले आहेत. आणखी काही मंडळी राजीनामे देण्याच्या बेतात आहेत. पाक लष्कराने कितीही बोंबाबोंब केली तरी पाकिस्तानच्या जन्मापासून ते कारगिल युद्धापर्यंत चार वेळा पाकिस्तानला भारताने चांगलेच ठोकून काढलेले होते. त्याआधी स्वतंत्र झाल्यावर १९७१ सालामध्ये पुन्हा आपणच पाकिस्तानची विभागणी करून बांगलादेशची निर्मिती केली होती. त्यावेळी पाकिस्तानच्या जनरलपदी नियाझी नावाचे जे गृहस्थ होते. त्यांनी भारताच्या लष्करासमोर गुडघे टेकून शरणागती पत्करली होती. थोडक्यात काय तर भारत आणि पाकिस्तान यांच्या युद्धात पाकिस्तानने नेहमीच सपाटून मार खाल्लेला आहे. पाकिस्तानचे लष्कर पाकिस्तानात कितीही दादागिरी करत असले. तरी त्यांची सध्याची खरी परिस्थिती काय आहे. हे लष्करात काम करणाऱ्या सैनिकांना ठाऊक आहे. अभी मारा तो मारा, अब मार भला असे म्हणत म्हणत चांगल्या पद्धतीने कुटले गेल्यावर जोडे चाटण्याची सवय असलेल्या पाकिस्तानच्या लष्कराला भविष्याची कल्पना आलेली असावी. या सर्व उलाढालीमध्ये प्रत्यक्ष काय होते. ते ठाऊक असल्यावरही बिनकामाच्या लंब्या बाता करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांपासून इंदिराजी यांच्यासमोर गुडघे टेकणाऱ्या भुत्तोच्या नातवालाही आता धडकी भरलेली आहे. न जाणो भारताच्या लष्कराने आक्रमण करून पाकिस्तानच्या राजधानीवर कब्जा केला. तर आपले काय होईल, हे त्यांना ठाऊक आहे. म्हणूनच पाक लष्कर प्रमुखांचे कुटुंब आणि या दर्पोक्ती करणाऱ्या बिलावलचे म्हणजेच बिलावल भुत्तोचे कुटुंब परदेशात कॅनडा येथे गेलेले आहे. भारतातील या दहशतवादी हल्ल्याला लष्कर प्रमुख असलेल्या मुनीर याची चिथावणीच होती. हे काही लपून राहिलेले नाही. हा मुनीर पूर्वी आयएसआय चा प्रमुख होता. त्यानेच पुलवामा हल्ला करण्याचा कट घडवून आणला होता. काही दिवसांपूर्वी या मुनिराने काश्मीर बद्दल मोठे विधान केले. त्यानंतरच पाकिस्तानच्या काश्मीरमधील रावळकोट मधून प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्यांनी पहेलगामचे हे जघन्य हत्याकांड केले. सध्या पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याबाबत भारतातील सत्ताधारी पक्षांनी त्यामध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, विदेश मंत्री एस जयशंकर यांनी छाती ठोकून याबाबत ठाम विधान केले होते. या हल्ल्याचा बदला म्हणजे केवळ सिंधू नदीचे पाणी बंद करण्यापुरता होणार नाही. तर भारताला आपले काश्मीर परत मिळवण्यासाठी काही अपवाद सोडल्यास जागतिक पाठिंबा मिळाल्यामुळे पाकिस्तानने चोरलेले आपले काश्मीर घेण्याची हीच संधी आहे. हे आम्हाला नमूद करावेसे वाटते. त्यासोबतच आम्ही वर म्हटल्याप्रमाणे १९७१ मध्ये जे झाले. त्यानुसार आताही लष्कर प्रमुख असिफ मुनीर यांना शरणागती पत्करणे भाग पडणार आहे. त्याच मुनिराने पाकिस्तानची मृत्यू घंटाच लिहून ठेवलेली दिसते. एक तर पाकिस्तानात प्रादेशिक वाद मोठ्या प्रमाणात उफाळलेला आहे. सिंध प्रांत, बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत सर्वच वेगळे होऊ इच्छितात. ज्याप्रमाणे १९७१ मध्ये बांगलादेश स्थापन झाला. तशीच परिस्थिती आताही उद्भवणार आहे. आज पाकिस्तानचे लष्कर आणि सत्ता पाकिस्तानातील पंजाब्यांच्या हाती आहे. त्यामुळे आणि त्यांच्या मनमानीमुळे इतर विभागात अत्यंत जबरदस्त आक्रोश आहे. भारताला पाकिस्तानात न जाता ही सायबर हल्ले करता येतात. पाणीपुरवठा खंडित करता येतो. वीज, बँकिंग, दूरसंचार सेवा अस्ताव्यस्त करता येते. गरज पडली तर पाणी सोडून पूर परिस्थिती आणता येते. पण भारताच्या लष्कराला बहुधा आहे मान्य नसावे. त्यांना तर या नागड्या पाकड्यांना आपल्या चरणावर लोटांगण घातलेले पाहायचे आहे. भारताच्या या इराद्याला जगातील कोणीही आव्हान देऊ शकत नाही. एकमेव चीन हा देश वगळता कोणीही पाक बरोबर येणार नाही. चीनलाही शाब्दिक सहानुभूती आणि गुप्त मदतीशिवाय फारसे काही करता येणार नाही भारताच्या प्रचंड मोठ्या बाजारपेठेवर पाणी सोडणे चीनला शक्य होणार नाही. अमेरिकेच्या दादागिरी पुढे चीनला सुद्धा आपला माल विकण्यासाठी भारताचीच गरज आहे. पहलगामच्या हल्ल्यानंतर भारतावर अणू प्रयोग करण्याची धमकी पाकिस्तानच्या एका महामूर्ख नेत्याने दिलेली आहे. पण अण्वस्त्रांचा प्रयोग किंवा उपयोग करणे तितके सोपे नाही. हे त्या पागल माणसाला कोणी तरी सांगितले पाहिजे. पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआय यांना सिंधू नदीच्या पाण्यात बुडविणे हेच आता भारताचे लक्ष आहे. आता भारताच्या भीतीमुळे पाकिस्तानच्या लष्करातील घरंदाज पळपुटे म्हणजेच भगोडे किती दिवसात लष्कर सोडून पळतात. ते आपल्याला बघायचे आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानला कोणताही पर्याय दिसत नसल्यामुळे केवळ शब्दकोट्या करून आपली शाब्दिक बहादुरी दाखवणे. एवढेच कार्य त्यांच्यासाठी शिल्लक आहे. भारतातील सर्व पक्षांचा पाठिंबा सरकार बरोबर आहे. त्यामुळे आता पाकिस्तानची सुरू असलेली लष्करी बळ-बळ आणि त्यांच्या नेत्यांची वाचाळ वळवळ, वळचणीला लावून भारतीय बहाद्दरांनी पाकड्यांची लवकरात लवकर जिरवावी. एवढीच आमची माफक अपेक्षा आहे. बोला, भारत माता की जय!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## सिडकोतील कामठवाडे भागात भरदिवसा डोक्यात दगड घालून तरुणाचा खून

नाशिक , दि. २८ प्रतिनिधी
नवीन नाशिक परिसरातील कामटवाडे भागात अमरधाम रोडवर चौघा जणांनी डोक्यात दगड घालून तरुणाची हत्या केली. या हत्याकांडाने नाशिक शहर पुन्हा एकदा हादरले असून शहरात



खुनाचे सत्र सुरूच असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनल्याचे दिसून येत आहे. दरम्यान पूर्ववैमनस्यातून मृत तरुणाची हत्या झाल्याचे पोलिसांनी सांगितले. करण चौरे (रा.संत कबीर नगर झोपडपट्टी गंगापुर) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असून गेल्या महिन्यात संत कबीर नगर मध्ये झालेल्या खुनाच्या गुन्ह्यात सहभागी असल्याच्या कारणावरून त्याची अमानुषपणे हत्या केल्याचे समजते. दरम्यान या खुनाच्या घटनेने सिडको परिसर पुन्हा एकदा हादरला असून परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी मयत करण चौरे हा आपल्या मित्रांसोबत कामटवाडे परिसरात आला होता. यावेळी त्याचे दुस-या गटातील मित्रही तिथे आले .यावेळी जुन्या भांडणाची कुरापत काढुन वाद झाला. त्यातून डोक्यात दगड घालून हत्या करण्यात आली. त्यानंतर हे सर्व जण फरार झाले याघटनेची माहिती अंबड पोलीसांना मिळताच पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहचले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान मयत करण चौरेची देखील गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. या प्रकरणी एकाला अटक केली असून पोलीस तपास सुरू आहे.

# पाकिस्तानी लष्करात धडाधड राजीनामे

इस्लामाबाद, दि. २८ वृत्तसंस्था
गेल्या आठवड्यात काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्याचे कनेक्शन नेहमीप्रमाणे पाकिस्तानशी जोडले असल्याची बाब समोर आली. यानंतर भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांना अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. तर पाकिस्तानकडूनही सीमारेषेवर सैन्याची जमवाजमव सुरु झाली आहे. परिणामी भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणत्याही क्षणी युद्धाला तोंड फुटेल, अशी जोरदार चर्चा आहे. युद्धाचे हे ढग दाटले असताना पाकिस्तानी लष्करात भूकंप झालेलाल आहे हे तथ्य सांगणारी एक बातमी समोर आली आहे. त्यानुसार सध्या पाकिस्तानी सैन्यदलात अधिकारी आणि सैनिक मोठ्याप्रमाणावर राजीनामे देत आहेत. या सगळ्यांना पाकिस्तानी लष्करातील नोकरी तातडीने सोडायची असल्याची बाब समोर आली आहे.



एकूण २५० अधिकारी १२०० सैनिकांनी तडकाफडकी राजीनामे दिल्याची माहिती आहे.

पाकिस्तानच्या ११व्या कोअरचे प्रमुख ओमर अहमद बोकारी यांनी लष्करप्रमुख असीम मुनीर यांना पत्र लिहले आहे. हे गोपनीय पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, १२ क्वेटा कोअर, फर्स्ट कॉर्प मांगला रिजन, नॉर्दन कमांडमधील अनेक अधिकारी आणि सैनिकांनी राजीनामे दिले आहेत. फर्स्ट कॉर्प मांगला रिजनमध्ये तर ५० अधिकारी आणि ५०० सैनिकांनी लष्करी सेवेतून निवृत्त होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या सगळ्यांनी वैयक्तिक कारण, कामाचा वाढलेला तणाव आणि भारतासोबत निर्माण झालेल्या तणावजन्य परिस्थितीबाबत सरकारकडे नसलेले ठोस धोरण या बाबींचा उल्लेख आपल्या राजीनामा पत्रात केला आहे. यानंतर पाकिस्तानी लष्कराच्या जनसंपर्क विभागाने युद्धाच्या परिस्थितीत कोणत्याही अधिकाऱ्याने अथवा सैनिकाने राजीनामा देऊ नये, अशी तंबी देऊन ही पडझड तुर्तास थांबवल्याचे सांगितले जात आहे. या परिस्थितीवर तोडगा काढावा, अशी मागणी लष्करप्रमुखांकडे करण्यात आली आहे. त्यामुळे आता पाकिस्तानी सरकार काय पावले उचलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात १९४८,१९६५, १९७१ आणि १९९९ अशी चार युद्ध झाली. या चारही युद्धांमध्ये भारताने पाकिस्तानला पार झोपवले होते. त्यामुळे आता पुन्हा युद्ध झाल्यास भारतीय लष्कराच्या संभाव्य संहाराची भीती अनेकांना वाटत असावी. त्यामुळे पाकिस्तानमधील बडे नेते आणि लष्करी अधिकाऱ्यांची कुटुंब देशातून पळ काढत आहेत. अलीकडेच पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर आणि राजकीय नेते बिलावल भुट्टो यांच्या कुटुंबाने पाकिस्तान सोडून परदेशात पळ काढलेला आहे.

## धर्म विचारून गोळ्या घालण्याइतपत वेळ दहशतवाद्यांकडे असतो का?- वडेट्टीवार

## वडेट्टीवारांचे विधान हे असंवेदनशील - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई, दि. २८ प्रतिनिधी
पहलगाममध्ये पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात २६ जणांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी पर्यटकांना ओळख पटवून वेगळं केलं आणि गोळ्या घालून ठार केले. पीडितांच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना लक्ष्य केलं आणि गोळ्या घातल्या. मात्र आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे नवा वाद उफाळून आला आहे. धर्म विचारून गोळ्या घालण्याइतपत वेळ दहशतवाद्यांकडे असतो का? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर देत हे विधान असंवेदनशील असल्याचे म्हटलं.

२२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांचा जीव गेला होता. दहशतवाद्यांनी धर्माबाबत विचारून ओळख पटवून पर्यटकांची हत्या केली. मृत्यूमुखी पडलेल्यांच्या



कुटुंबियांना केलेल्या दाव्यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित केला. दहशतवादी हल्ला करतेवेळी लोकांशी बोलत बसतात का? धर्म विचारत बसतात का? असा सवाल वडेट्टीवारांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत बोलताना वडेट्टीवारांनी मृत्यूमुखी पडलेल्याच्या कुंटुंबियांच्या जखमांवर मीठ चोळले असल्याचे म्हटलं.

"अशा प्रकारची वक्तवे करुन जे मृत्यूमुखी पडले आहेत त्यांच्या नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम चाललं आहे. नातेवाईकांचे म्हणणं सगळ्यांनी दाखवलं. ज्यांच्या समोर मारले त्या नातेवाईकांनी सांगितले आहे. तिथे वडेट्टीवार नव्हते. इथे बसून अशा प्रकारची वक्तव्ये करुन नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळणे अतिशय वाईट आहे. याला मूर्खपणा म्हणावं की काय हे मला समजत नाहीये," असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

"वडेट्टीवारांचे विधान हे असंवेदनशील आहे. तिथे ज्यांची हत्या झाली त्यांच्या कुटुंबियांनी जे सांगितले त्याला खोटं ठरवणं यापेक्षा जास्त असंवेदनशीलता काय असू शकते. विजय वडेट्टीवारांना पीडितांचे कुटुंबिय कधीही माफ करु शकणार नाही. असे मूर्खपणे विधान करणे हे एकप्रकारे जे आपले शत्रू आहेत त्यांना प्रोत्साहन देण्यासारखे आहे," असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## ओटीटी, सोशल मीडियावरील अश्लीलता गंभीर समस्या

# 'काही तरी करा...'

## सर्वोच्च न्यायालयाची केंद्राला नोटीस



नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था
ओटीटी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्ट्रिमिंग होणाऱ्या अश्लील कंटेंटबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. यावर बंदी घालण्यासाठी केंद्राला योग्य पावले उचलण्याचे निर्देश देण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली होती. या जनहित याचिकेची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम, उल्लू, एएलटीटी, एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक, इन्स्ट्राग्राम, यूट्युबआणि इतर प्लॅटफॉर्म्सना नोटीस बजावली आहे.

सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील अश्लील कंटेंटचे नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेची दखल घेतली. त्यावर न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, या समस्येमुळे गंभीर चिंता निर्माण झाली आहे. त्यावरील उत्तरात केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले की आणखी काही नियम विचाराधीन आहेत.

''जनहित याचिकेतून महत्त्वाचा चिंतेचा मुद्दा उपस्थित केला आहे.'' असे निरीक्षण नोंदवत न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती एजी मसीह यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार आणि ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम, अल्टबालाजी, उल्लू डिजिटल, मुबी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X कॉर्प, गुगल, मेटा इंक आणि ॲपल यांना नोटीस बजावली.

याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वकील विष्णू शंकर जैन यांनी म्हटले की, हे प्रकरण विरोधी खटला म्हणून नाही तर खरोखरच चिंता निर्माण करणारे आहे. कोणत्याही प्रकारचे नियमन अथवा नियंत्रण नसलेल्या सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या कंटेंटच्या मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. यावेळी न्यायमूर्ती गवई यांनी केंद्र सरकारची बाजू एकून घेतली. "मिस्टर सॉलिसिटर? काहीतरी करा... याबाबत काहीतरी कायदे करावेत.." अशी विचारणा न्यायमूर्ती गवई यांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केली.

यावर सॉलिसिटर जनरल मेहता म्हणाले की, काही नियमित कार्यक्रमांमध्येही अश्लील कंटेंटचा समावेश असतो. काही कार्यक्रम इतके विकृत स्वरुपाचे असतात की ते दोन सभ्य पुरुष एकत्र बसून ते पाहू शकत नाहीत, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. सेन्सॉरशिप नसावी का? यावर सहमती दर्शवत एसजी मेहता म्हणाले की काही मर्यादेपर्यंत अंमलबजावणी आवश्यक आहे. काही नियम विचाराधीन आहेत.

न्यायालयाने त्यांच्या आदेशात असे निरीक्षण नोंदवले की, "ही याचिका ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील विविध आक्षेपार्ह, अश्लील आणि असभ्य कंटेंट दाखवण्यावरून चिंता उपस्थित करणारी आहे. यावर मेहता यांनी स्पष्ट केले आहे की हा विषय विकृतीच्या मर्यादा ओलांडणारा आहे. आणखी काही नियम विचाराधीन असल्याचे त्यांनी नमूद केले.''

# भारताची फ्रान्ससोबत 63,000 कोटी रुपयांची राफेल डील

नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था
समुद्रात आपली शक्ती वाढवण्याच्या चीनच्या योजनांना हाणून पाडण्यासाठी भारताने सर्व व्यवस्था केली आहे. सोमवारीच भारत आणि फ्रान्समध्ये एक मोठा संरक्षण करार झाला. २६ राफेल सागरी लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी दोन्ही देशांदरम्यान ६३,००० कोटी रुपयांचा करार झाला. फ्रान्सचे राजदूत आणि संरक्षण सचिव राजेश कुमार यांनी या करारावर स्वाक्षरी केली. दोन्ही देशांचे संरक्षण मंत्री व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सामील झाले.

सूत्रांचे म्हणणे आहे की संपूर्ण कार्यक्रम साउथ ब्लॉकमधील संरक्षण मंत्रालयाबाहेर झाला. यापूर्वी, फ्रान्सचे संरक्षण मंत्री भारताला भेट देणार होते परंतु वैयक्तिक कारणांमुळे त्यांना हा दौरा रद्द करावा लागला. संरक्षण मंत्रिमंडळ समितीने या कराराला आधीच हिरवा कंदील दाखवला होता.

भारताच्या युद्धनौकांना तातडीने नवीन लढाऊ विमानांची आवश्यकता आहे. देखभालीशी संबंधित समस्यांमुळे मिग-२९ लढाऊ विमाने आता पूर्वीसारखी काम करत नाहीत. असे सांगितले जात आहे की राफेल विमान आयएनएस विक्रांतवर तैनात केले जाऊ शकते. या राफेल करारात शस्त्रे, उपकरणे, सुटे भाग आणि क्रू प्रशिक्षण आणि लॉजिस्टिक सपोर्टचाही समावेश असेल. राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण खरेदी परिषदेने नौदलाचा प्रस्ताव स्वीकारला आणि २६ राफेल एम लढाऊ विमाने खरेदी करण्यास सहमती दर्शविली. ही विमाने युद्धनौकांवर तैनात करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहेत. फ्रेंच सैन्य आधीच त्यांचा वापर करत आहे.

भारताकडे आधीच ३६ राफेल विमाने आहेत. २०१६ मध्येच, या विमानांसाठी फ्रेंच कंपनीसोबत करार करण्यात आला होता. नवीन करारानंतर, भारतातील राफेल विमानांची संख्या ६२ पर्यंत वाढेल.



# बुलेट ट्रेनने 2028 पर्यंत प्रवास शक्य - मुख्यमंत्री

मुंबई, दि. २८ प्रतिनिधी
राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. त्यामध्ये रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग आदींसह बंदर आणि विमानतळ विकासाच्या कामांचा समावेश आहे. या संपूर्ण विकासाच्या 'इकोसिस्टीम'मुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हॉटेल फोर सीजन येथे इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडर समिट - २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम गतीने सुरू आहे. या ट्रेनने २०२८ पर्यंत प्रवास करणे शक्य होणार आहे. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचे स्थानक निर्माण करण्यात येणार आहे. व मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. सागरी किनारा रस्ता, अटल सेतू, विविध मेट्रो मार्गांची कामे ही त्यातली ठळक उदाहरणे आहेत. या सर्व विकास कामांमुळे मुंबईत गुंतवणूक ५० बिलियन डॉलरपर्यंत



जाणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प गेम चेंजर ठरणारे आहेत. यासोबतच पुणे येथील नवीन विमानतळ, शिर्डी, नागपूर विमानतळाचा विकास, नदी जोड प्रकल्प, बुलेट ट्रेन प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

सागरी किनारा रस्ता विरारपर्यंत वाढविण्यात येत आहे. वाढवण बंदर हे सध्या अस्तित्वात असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्टपेक्षा तीन पट मोठे आहे. या बंदराला प्रवेश नियंत्रित असलेल्या महामार्गाने नाशिकपर्यंत जोडण्यात येऊन पुढे समृद्धी महामार्गाला जोडण्यात येईल. वाढवण बंदराजवळ नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच या परिसरात चौथ्या मुंबईचेही निर्माण करण्यात येणार आहे.

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पुरामुळे वाहून जाणारे पाणी तसेच पश्चिम घाटातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उजनी धरण व मराठवाड्यात वळविण्यात येणार आहे. यावर राज्य शासन काम करीत आहे. त्यामुळे भविष्यात मराठवाडा निश्चितच दुष्काळमुक्त होणार आहे. ‘समृद्धी महामार्ग’ नंतर राज्यात नागपूर ते गोवा ‘शक्तिपीठ महामार्ग’ निर्माण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे नेहमी भविष्यासाठी 'रेडी' असणारे राज्य आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात गुंतवणूकदारांना सोयी सुविधा मिळण्यासाठी व गतीने गुंतवणूक येण्यासाठी ‘इज ऑफ डुईंग बिजनेस’ मध्ये राज्य मोठी झेप घेत आहे. २०२९ मध्ये महाराष्ट्र 'इज ऑफ डुईंग बिजनेस' मध्ये पहिला असेल. गुंतवणूकदारांच्या सुविधेसाठी मैत्री पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून 'सिंगल विंडो सिस्टीम' कार्यान्वित करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना सिंगल विंडो सिस्टीममुळे उद्योग स्थापन करण्यास सुलभता येत आहे.

दळणवळणाच्या सोयी सुविधांचा होणाऱ्या विकासामुळे राज्यात मालवाहतूक गतीने करण्यात येत आहे. नागपूरपर्यंत आठ तासांमध्ये जवाहरलाल नेहरू बंदरापासून जाता येते. वाढवण बंदरामुळे यामध्ये आणखी गतिमानता येणार आहे. नागपूर येथे कार्गो हब विकसित करण्यात आले आहे. यासोबतच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही कार्गो हब विकसित करण्यात येत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी विकासाचा आलेख मांडला. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा निर्मिती करण्यात येत आहे. कृषी क्षेत्राचे १६००० मेगावॅटची वीज पूर्णपणे सौर उर्जेवर निर्माण करण्यात येणार आहे. सध्या या क्षेत्रात २१ टक्के राज्याची क्षमता असून २०३० पर्यंत ती ५२ टक्क्यांपर्यंत नेण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

## भारताचा पाकवर डिजिटल स्ट्राइक
## डॉन न्यूज, जिओ न्यूजसह 16 यूट्युब चॅनेल्सवर बंदी

नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था
जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेत १६ पाकिस्तानी युट्युब चॅनेल्सवर बंदी घातली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने पाकिस्तानच्या बंदी घातलेल्या त्या १६ चॅनेलची लिस्ट जारी केली आहे.

गृहमंत्रालयाच्या शिफारशीवरून डॉन न्यूज, सामा टीव्ही, एआरवाय न्यूज , जिओ न्यूज यासह अन्य चॅनेल्सवर ही बंदी लागू करण्यात आली आहे. यामध्ये माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब अख्तरच्या यूट्यूब चॅनेलचा देखील समावेश आहे.

सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या चॅनेल्सकडून भारत, भारतीय सैन्य आणि सुरक्षा यंत्रणांविरुद्ध भडकाऊ, धार्मिक तेढ वाढवणारी, खोटी व दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात होती. देशाच्या सुरक्षिततेला धोका पोहोचवणाऱ्या या प्रकारांवर लगाम घालण्यासाठी ही कठोर कारवाई करण्यात आली आहे.

भारतीय सरकारने स्पष्ट केले आहे की, देशाच्या सार्वभौमत्वाशी आणि सामाजिक सलोख्याशी खेळणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या डिजिटल प्रचाराला मुळापासून थांबवले जाईल. या कारवाईनंतर अधिकृत यंत्रणांकडून पुढील पावले आणि तपासाच्या प्रक्रियेची माहिती लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे आहे, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्रालयांने दिली आहे.

## तुमचे बजेट आमच्या लष्करी बजेटइतकेही नाही
## ओवैसींनी पाकिस्तानला सुनावले

हैदराबाद, दि. २८ वृत्तसंस्था
पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाल्यानंतर देशभरात आक्रोश निर्माण झाला आहे. या नसरंसहारामागे पाकिस्तानचा हात असल्याचे पाकिस्तान असल्याचा आरोप भारताकडून करण्यात येत आहे. त्यामुळे भारताने पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेत कठोर निर्णय घेतले आहेत. त्यामुळेच पाकिस्तान आता भारताला धमक्या देत आहे. अशातच भारतातून सर्वपक्षीय नेत्यांकडून पाकिस्तानकडून करण्यात येणाऱ्या वक्तव्यांनाचा निषेध नोंदवण्यात येत आहे. एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. काश्मीर आपला भाग होता, आहे आणि राहील आणि काश्मिरी देखील आपला भाग आहेत, असे असदुद्दीन ओवैसी म्हणाले.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याबद्दल पाकिस्तानवर पुन्हा टीका करताना एआयएमआयएमचे अध्यक्ष आणि हैदराबादचे खासदार असदुद्दीन



ओवैसी यांनी पाकिस्तान भारतापेक्षा अर्ध युग मागे असल्याचे म्हटलं. पाकिस्तान, आयसिस आणि लश्कर ए तोयबा हे भारतातील हिंदू आणि मुस्लिमांमध्ये अधिक द्वेष पसरवायला पाहत आहेत. पण त्यांचे कट उधळून लावण्यासाठी आपल्याला एकजूट राहावे लागेल, असेही असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटलं.

ओवैसी हे परभणी येथे नव्या वक्फ कायद्याच्या निषेधार्थ जाहीर सभेत बोलत होते. "तुम्ही भारतापेक्षा अर्धा तास नाही तर अर्ध युग मागे आहात. पाकिस्तानी नेत्यांनी उगाच भारताला धमक्या देऊ नयेत. तुमच्या देशाचे बजेट आमच्या लष्करी बजेटइतकेही नाही. पाकिस्तान वारंवार म्हणतो की त्यांच्याकडे अणुबॉम्ब आहेत. लक्षात ठेवा, जर तुम्ही दुसऱ्या देशात जाऊन निष्पाप लोकांना मारले तर कोणताही देश गप्प बसणार नाही. तुम्ही कोणत्या धर्माबद्दल बोलत आहात? तुम्ही वाईट आहात. हे कृत्य दाखवत आहे की तुम्ही आयसिसचे उत्तराधिकारी आहात," असे असदुद्दीन ओवैसी म्हणाले.

"पाकिस्तान अनेक वर्षांपासून भारताला लक्ष्य करण्यासाठी दहशतवाद्यांना प्रशिक्षण देत आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार भारताला पाकिस्तानी हवाई दलाची नाकेबंदी करण्याची आणि हॅकर्सचा वापर करून त्यांचे इंटरनेट हॅक करण्याची परवानगी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. देशाच्या पंतप्रधानांना सांगायचे आहे की जेव्हा काश्मीर आमचा अविभाज्य भाग आहे असं म्हटलं जातं तेव्हा काश्मिरी देखील आमचे आहेत.काश्मीर आमचा भाग होता, आहे आणि राहील आणि काश्मिरी देखील आमचेच आहेत," असेही असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटलं.

# पर्यटकांना सुरक्षित परत पाठवणे माझे कर्तव्य होते- ओमर अब्दुल्ला

श्रीनगर, दि. २८ वृत्तसंस्था
जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सोमवारी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत, याचा निषेध केला. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता, ज्यामध्ये बहुतेक पर्यटक होते. राज्य विधानसभेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे वेदना व्यक्त करण्यासाठी शब्द नाहीत. त्यांनी सांगितले की, या दुर्घटनेने केवळ पीडितांच्या कुटुंबियांनाच नव्हे तर संपूर्ण देशालाही धक्का बसला आहे. याचबरोबर त्यांनी, २२ एप्रिल रोजी बैसरन खोऱ्यात झालेल्या हल्ल्यातील बळींच्या कुटुंबियांची माफी मागण्यासाठी त्यांच्याकडे शब्द नाहीत, असे म्हटले आहे.

विधानसभेच्या विशेष अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले, “या घटनेचा संपूर्ण देशावर परिणाम झाला आहे. आपण असे अनेक हल्ले यापूर्वी पाहिले आहेत. पहलगामच्या बैसरणमध्ये २१ वर्षांनंतर इतका मोठ्या हल्ला झाला आहे. मृतांच्या कुटुंबियांची माफी कशी मागावी हे मला समजत नाही. यजमान असल्याने, पर्यटकांना सुरक्षित परत पाठवणे हे माझे कर्तव्य होते. मी ते मी पार पाडू शकलो नाही. माझ्याकडे माफी मागण्यासाठी शब्द नाहीत.”

मुख्यमंत्री अब्दुल्ला पुढे म्हणाले की, “काश्मीरच्या मशिदींमध्येही दहशतवादाविरुद्ध निषेध व्यक्त



करण्यात आला आहे. ही काश्मीरमधील दहशतवादाच्या अंताची सुरुवात आहे. लोक जेव्हा आपल्याला पाठिंबा देतील तेव्हाच दहशतवाद संपेल. ही त्याची सुरुवात आहे. आपण असे काहीही बोलू नये किंवा दाखवू नये ज्यामुळे या चळवळीला हानी पोहोचेल. जेव्हा लोक आपल्याला पाठिंबा देतील तेव्हाच दहशतवाद संपेल. आणि आता असे दिसते की लोक त्या टप्प्यावर पोहोचत आहेत.”

२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगामजवळील बैसरन व्हॅलीमध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. तर २० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर काश्मीर खोऱ्यातील हा सर्वात घातक हल्ला असल्याचे मानले जाते. दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्यांपैकी बहुतेक पर्यटक होते.

दरम्यान या हल्ल्यामागे पाकिस्तनास्थित संघटना असल्याचे समोर येतार केंद्र सरकारने कठोर कारवाई सुरू केली आहे. याचाच भाग म्हणून केंद्र सरकारने सर्व पाकिस्तानी नागरिकांना तत्काळ भारत सोडण्याचे आदेश दिले आहे.

गेल्या चार दिवसांत अटारी सीमेवरून एकूण ५३७ पाकिस्तानी नागरिकांना परत पाठवण्यात आले आहे. देशभरातील राज्य सरकारे आणि सुरक्षा संस्था याबाबत कारवाई करत आहेत. दुसरीकडे, १४ राजनयिक आणि अधिकाऱ्यांसह एकूण ८५० भारतीय पंजाबमधील आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानातून भारतात परतले आहेत.

## महत्त्वाचे

### इंदिरानगरला मारुती मंदिरात सीता नवमी

**नाशिक ।** विश्व हिंदू परिषदेतर्फे सीता नवमीनिमित्त इंदिरानगर येथे मारुती मंदिरामध्ये आज सत्संग व प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित



केला गेला होता. कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून सौ. स्वातीताई वाळिंबे होत्या, त्यांनी आधुनिक सीतांनी कसे वागावे याबद्दल मार्गदर्शन केले व सीतामाईंच्या वनवासाबद्दल माहिती सांगितली. विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष श्री विराजजी लोमटे यांनी प्रास्ताविक केले, तर सोनाली ताई कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला, आणि कांचनताई गायधनी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयाम प्रमुख श्री. प्रशांत कुलकर्णी, श्री. बापट काका, श्री. देसाई काका सौ. प्रेरणा जोशी, सौ. माधवी कुलकर्णी उपस्थित होते.

### फिरते विज्ञान केंद्र 'सनराईज'च्या दारी

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संचलीत सनराईज स्कूलच्या विद्यार्थ्यांनी




नुकताच विज्ञान प्रदर्शनाचा आनंद लुटला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इंजि. पोपटराव पाचोरकर, शाळेचे प्राचार्य डी. बी. ढिकले व नीता पवार यांनी फिरते विज्ञान प्रदर्शन बसचे स्वागत केले. याप्रसंगी इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना वैज्ञानिक जादूचे प्रयोग दाखविण्यात आले. तसेच इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी मोबाईल सायन्स कार्यशाळा बसला भेट देऊन विज्ञानाचे चमत्कार, विज्ञान प्रदर्शन बघितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी होती. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांचे शिकणे मजेदार व आकर्षक बनले. नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई व मविप्र माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिकमधील विविध शाळांमध्ये फिरते विज्ञान प्रदर्शन मोफत बघण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### मविप्र सनराइज स्कूलमध्ये इंग्रजी भाषा दिन साजरा

**नाशिक ।** मविप्र सनराइज स्कूलमध्ये इंग्रजी भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सर्वप्रथम शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इंजि.पोपटराव पाचोरकर, चांदवड तालुका शिक्षण विस्तार अधिकारी वसंतराव खैरनार, प्राचार्य डी. बी. ढिकले यांनी विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेमध्ये विविध उपक्रम विद्यार्थ्यांसमोर सादर केले. विद्यार्थ्यांसमोर नाटिका सादर करून अतिशय सोप्या पद्धतीने इंग्रजी भाषा तसेच व्याकरणाचे महत्त्व विशद केले. प्राचार्य डी. बी. ढिकले म्हणाले, इंग्रजी भाषेचा सराव केल्यास ती सहजच आत्मसात होऊ शकते, सर्व विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा सराव करून ती आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, तसेच विल्यम शेक्सपियर यांचे पुस्तके वाचा हेदेखील त्यांनी सांगितले. इयत्ता सातवीचा विद्यार्थी कु. सिद्धेश वाकचौरे याने इंग्रजी भाषा दिनाची माहिती सांगितली. कु.अथर्व आथरे, कु.सिद्धेश वाघ यांनी सूत्रसंचालन केले.

### होरायझन अकॅडमीत प्लास्टिक प्रदूषणावर विशेष सत्र

**नाशिक ।** मखमलाबाद येथील होरायझन अकॅडमीमध्ये विश्व पृथ्वी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्या श्रुती देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक प्रदूषणावर विशेष सत्र पार पडले. सिद्धी राठोड आणि अवनी ब्राह्मणे यांनी स्वागत केले. त्यानंतर दीपप्रज्वलन व प्रतिकात्मक वृक्षारोपण करण्यात आले. विविध वर्गांतील विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणे केली. ५ वी 'ब' वर्गातील अनन्या शिंदे हिने पर्यावरण रक्षण आणि पृथ्वीच्या भविष्याच्या संरक्षणात युवकांची भूमिका यावर उत्स्फूर्त भाषण केले. ६ वी 'ब' मधील इशिता नाटेकर आणि सान्वी ढिकले यांनी सादर केलेल्या कवितेने निसर्ग सौंदर्याचे भावनिक चित्रण करत उपस्थितांचे मन जिंकून घेतले. प्राचार्या श्रुती देशमुख यांचे प्लास्टिक प्रदूषणावरील सादरीकरण (PPT). कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. त्यांनी प्लास्टिक कचऱ्याचे पर्यावरणावर होणारे गंभीर परिणाम, त्याचा सागरी जीवन, परिसंस्था व मानवी आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच, रोजच्या आयुष्यात प्लास्टिकचा वापर कसा कमी करता येईल, याविषयी उपयुक्त सूचना दिल्या. हे सादरीकरण विद्यार्थ्यांवर आणि शिक्षकांवर खोलवर प्रभाव पाडणारे ठरले. या सादरीकरणानंतर विद्यार्थ्यांनी पृथ्वी दिनाची शपथ घेतली, ज्यामध्ये त्यांनी पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्याचा आणि सजग नागरिक होण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाची सांगता सर्व सहभागी सदस्यांचे आभार मानत करण्यात आली. यावेळी सविता म्हैसधुणे, गौरव देशमाने, सुप्रिया चव्हाण आणि आयोजिका कु. प्रतिक्षा देवडे यांना गौरविण्यात आले.

# जिल्हा बँक बुडणारेच निघत आहेत तोडगे!

नाशिकची जिल्हा बँक मुख्य अर्थवाहिनी शेतकऱ्याना आधार देणारी हक्काची बँक. पण याच बँकेचा परवाना रद्द व्हायची वेळ आल्यावर धावाधाव सुरू झाली. वेगवेगळे तोडगे निघत आहेत, पण सर्व वाया जाणार आहे. बडे थकबाकीदार महायुतीने निवडणुकीत कर्जमाफी करू या शब्दाला चिटकुन बसले असून त्यांना कर्जमाफी शिवाय कोणताच तोडगा मान्य होणार नाही.

बँक वाचवायची तर बोटचेपे धोरण वापरून काही निघणार नाही. सध्याचे प्रशासक प्रतापसिंह चव्हाण यांनाच सर्व कायदेशीर अधिकार वापरू दिले तरच बँक जगणार नाहे. चव्हाणांनी वसुली मोहीम सुरू करतांना पठाणी नव्हे तर नियमांच्या चौकटीतच वसुलीसाठी कडक धोरण स्विकारले होते. पण राजकीय हस्तक्षेपा मुळे त्यांना मनाप्रमाणे काम करू दिले जाणार नाही व त्यांना लवकरच तेथून काढून दुबळा प्रशासक बँकेच्या 'हे राम' साठी बसवला जाईल असे दिसते.

माजी संचालक व अधिकारी यांच्याकडे घेणे असलेले पैसे ते भरत नाहीत, तोपर्यंत थकबाकीदार पैसे भरणारच नाहीत हे नक्की. मोठे थकबाकीदार वजनदार व मात्तब्बर नेते आहेत. त्यांची पैसे न भरण्याची कठोर भुमीका लहान थकबाकीदारांना कर्ज न भरण्याचे बळ देते. खरे बोलले तर सख्या आईला राग येतो असे म्हणतात. पण वीस टक्के थकबाकीदार वेगवेगळ्या कारणांनी पैसे भरू शकत नाहीत. नैसर्गिक आपत्ती, कुटुंबावर आलेले संकट, आजार, शेतात पिकवले पण उत्पादनात घट आली, भाव मिळाला नाही ही कारणे लहान थकबाकीदारांच्या बाबतीत बरोबर आहे. पण मोठी शेती, करोडोंचे उत्पन्न, राजकारणात दबदबा, दरवर्षी संपत्तीत वाढ, ठेकेदारी व्यवसायातुन होणारी मोठी कमाई अशांनी थकबाकी भरायचीच नाही हे ठरवले असल्याने अजितदादा पवार व माणिकराव कोकाटेंनी कोणतेही तोडगे काढले तरी मान्य होण्याची शक्यताच कमी आहे. मागच्या काळात कांदा सरासरी चार हजारांनी विकला गेला. यंदा द्राक्षाचे पैसे वाढले असे शेतकरी सुध्दा नाही भरणार. तेही थकबाकीवर ठाम आहेत. म्हणुन नियमानुसार कडक भुमीका घेणे हाच बँक वाचवायचा तोडगा आहे. बँकेत झालेल्या शेतकऱ्यांच्या मिटींगमध्ये शेतकऱ्यांना विचारून तोडगा काढायचा व जिल्हाधिकारी, मंत्री, आमदार, खासदार यांच्या मिटींग मध्ये शेतकऱ्यांच्या भावना सांगायच्या व तोडगा काढायचा हा मिटींगचा मूळ हेतू होता. पण रथीमहारथी व थकबाकीदारांचे प्रतीनिधी यांनी अधिकाऱ्यांनाच कडक शब्दात सुनावले व शेवटी थकबाकी माफीवरच मिटींग संपली. या मिटींगमध्ये मोठ्या संकटात सापडलेले ठेवीदार व त्यांना जगायला, मरायला, लग्नासाठी बँक त्यांचे दाबुन ठेवलेले पैसे देत नाही. जे नियमीत कर्ज भरतात ते कर्जापासुन वंचीत आहेत. त्यांना थोडे कर्ज मिळते, पण हातात रूपया न देता ते पैसे फिक्स डिपॉजीट म्हणून ठेवले जातात. फक्त शासनाच्या दोन पाच हजारांच्या व्याज माफीचा फायदा मिळतो, अशा प्रामाणिकांचा विचार मात्र कोणीच नेता




करीत नाही. आता ना.अजितदादांनी बरेच तोडगे काढले. पण यातुन काहीच निघणार नाही हे नक्की. खरे तर थकबाकी वाढण्यास सर्वच सहकारी सोसायट्यांचे संचालक मंडळ पण जबाबदार आहे. माहीत असुन पैसे वेळेवर भरू न शकणाऱ्यांना अनेकांनी बँकेला कर्ज द्यायला भाग पाडले. पण स्वतःच्या सोसायटी सभासदांना समजवत गोड बोलून वसुली करायची जबाबदारी मात्र पार पाडली नाही. कारण परत सत्ता हवी असल्याने कुणाला न दुखवायचे बोटचेपे धोरण सोसायटी संचालकांनी राबवले व हे दिवस आणले. आता संचालक, चेअरमन अदखलपात्र झाले आहेत. बदाम, काजू दूरच चहाची पंचाईत झाली आहे.




एका सभासदाने संचालक मंडळाला विनंती केली की, आपण सर्व एकत्र थकबाकीदारांच्या घरी जावू व विनंती करू. आपला मान ठेवला जाईल व वसुलीही होईल. पण विरोधी गटाच्या एका संचालकाने पैसे भरू नका कर्जमाफी होणार आहे, असे जाहीर आवाहन केले. तर सत्तारूढ गटाचे म्हणाले नाही जाणार वसुलीला. कारण एखाद्याने आत्महत्या केली तर आम्ही अडचणीत येऊ. आता खुर्ची हवी, मान हवा पण जबाबदारीपासून दूर पळणाऱ्यांची जबाबदारी आहे की नाही? असे म्हणतात की, सोसायटींच्या संचालकांना जबाबदारी टाकली पाहीजे. त्यांच्या शब्दाला गावगाड्यात वजन असते. बरीच थकबाकी वसुल होऊ शकते.

पण चुकीचे तोडगे काढुन काहीच होणार नाही. सर्वांनी मनापासून प्रयत्न केले पाहिजेत. कडक कारवाई पेक्षा हे हत्यार कामात येईल. पण आश्वासन पूर्ण करता येत नसलेले नेते पळवाटा काढुन टाईमपासच करीत आहेत हे नक्की. रिझर्व बँकेने कर्ज माफीचे नाटक करणाऱ्या सरकारांना पण काळजी घ्यायला सांगितली आहे. आधी पैशांची तरतूद करा, नंतरच कर्जमाफी, नियमीत कर्ज फेडणाऱ्यांना सुध्दा थकबाकीदारांच्या प्रमाणात पैसे द्या असे केल्यास मुद्दाम थकबाकीदार रहाणे कमी होईल. माफी मिळाली ती लाखात, कोटीत व नियमीत भरणाऱ्यांना बारीक तुकडा मग नका भरू कर्ज अशी मानसिकता बळावत चालली आहे. निवडणुक आल्यावर जे भंपक आश्वासन देतात, तिजोरीचा अभ्यास करीत नाहीत, सत्ता मिळवतात, नंतर जनतेला फसवतात. याकडे निवडणुक आयोगानेच कडक भूमिका घेऊन बनवाबनवीची आश्वासने देता येणार नाही अशी तंबीच राजकीय पक्षांना दिली पाहिजे. आश्वासन पूर्ती न करणारे सरकार सहा महिन्यात बरखास्त करून घरी पाठवले पाहीजे अशी उपाययोजनाच देशाला तारू शकणार आहे. कृषी मंत्री माणिकराव कोकाटेंनी बँकेत ठेवी ठेवा या आवाहनाला प्रतिसाद मिळणे अवघड असले तरी या ठेवींनी बँक संकटमुक्त होणार नाही, हे नक्की. गावागावातील पहिल्या दहा थकबाकीदारांचे व वेळेवर कर्ज भरणारे गावा गावातील दहा अशांचे डिजीटल बोर्ड गावात लावा, कदाचित मन बदलेल.

# पद्मश्री चैतराम पवार यांच्या बारीपाड्याला नाशिककरांनी दिली भेट

**नाशिक ।** पद्मश्री चैतराम पवार यांनी बारीपाडा (ता. साक्री) जिल्हा धुळे येथे पर्यावरण संवर्धन क्षेत्रात केलेल्या कामाची नाशिकमधील अनेकांनी प्रत्यक्ष जाऊन माहिती घेतली. यावर्षीचा पद्मश्री पुरस्कार केंद्र सरकारच्या वतीने त्यांना जाहीर झाला आहे. सुमारे 12000 एकर जमिनीवर लोकसहभागातून जंगल निर्माण करून तेथील आदिवासी समाजाचे स्थलांतर त्यांनी थांबविले आहे. रानभाज्या महोत्सव सारखी संकल्पना त्यांनी राबविली आहे. जमिनीतील पाण्याची पातळी वाढवून कोरडवाहू



जमिनीला बागायत केले आहे. अशा शाश्वत विकासाची संकल्पना राबविली तर खऱ्या अर्थाने खेडी आणि गावे स्वयंपूर्ण होतील आणि स्थानिकांना रोजगार निर्माण होईल. यावेळी मराठा विद्या प्रसारक समाजाचे संचालक आणि माजी जिल्हा परिषद सदस्य प्रविणनाना जाधव, विजयनाना पगार, राजेंद्र कळमकर, अमोल देशमुख, पवन जाधव आणि मविप्र समाजाचे शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. विलास देशमुख यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# दहशतवादी हल्ला सुरु असतानाच काश्मीरमध्ये ऑपरेशनची मोहीम

## काश्मीरमधील शिबिरात नाशिकच्या डॉक्टरांकडून सेवा



**नाशिक ।** जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांकडून माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडत असतानाच महाराष्ट्रातील १८ डॉक्टर जम्मू-काश्मीरमधील नागरिक, महिला, मुलांवरील विविध प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी धडपडत होते. डॉक्टरांच्या माध्यमातून तेथील जब्बल ७०० रूग्णांवर शस्त्रक्रिया करून त्यांच्या दु:खावर फुंकर घालण्याचे काम करण्यात आले. विशेष म्हणजे नाशिक येथील रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० मधील स्त्रीरोगतज्ञ रोटरी क्लब ऑफ नाशिक मिडटाऊनच्या रोटरीयन आणि नाशिक आयएमएच्या सचिव डॉ. मनिषा जगताप या शिबिरात स्त्रियांना ऑपरेशनच्या सेवेसाठी सहभागी झाल्या होत्या. या ठिकाणी स्त्रीयांमधील गुंतागुंतीच्या अनेक शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्या.

यावेळी नांदेड येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ. अनिल साखरे आणि मुंबई येथील डॉ. शिवानी अग्रवालही उपस्थित होत्या. जम्मूमधील रोटरी क्लब ऑफ जम्मू तवी देखील सामिल होते, माजी प्रांतपाल डॉ. दुष्यंत व रोटेरियन अदिप यांनी देखील सहभाग नोंदवला. या शिबिरात जनरल सर्जन, लॅप्रोस्कोपिक सर्जन, ऑर्थोपेडीक सर्जन, इएनटी सर्जन, भुलतज्ञ असे २० डॉक्टरांची टीम होती. डॉ. राजीव प्रधान व डॉ. गिरीश गुणे यांच्या पुढाकारातून हे शिबिर यशस्वी झाले तसेच जम्मू काश्मीर मधील सरकारी यंत्रणांकडून मोलाचे सहकार्य लाभले.

# 'माझी प्रारतना' चित्रपटाचा हृदयस्पर्शी ट्रेलर प्रदर्शित!



**नाशिक ।** मराठी चित्रपटसृष्टीत एक नवीन आणि हृदयस्पर्शी प्रेमकथा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. पद्मराज राजगोपाल नायर दिग्दर्शित "माझी प्रारतना" हा सिनेमा सध्या खूप चर्चेत आहे आणि आज या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला असून रसिक प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रेम म्हणजे केवळ भावना नाही, तर जगण्याची एक जाणीव आहे आणि ही जाणीव सादर करणारा हा उत्कृष्ट ट्रेलर आहे. ट्रेलरमध्ये आपण पाहू शकतो की प्रेम जेव्हा अडचणींवर मात करत टिकतं, तेव्हाच त्याची खरी ताकद समोर येते. अशाच प्रेमाच्या विविध पैलूंना स्पर्श करणारा हा ट्रेलर आहे ज्यात सुंदर चित्रीकरण, उत्कृष्ट अभिनय, मधुर संगीत आणि इमोशन्स आपण पाहू शकतो. चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर कथेबाबतची उत्कंठा आणखीनच वाढली आहे.

कथेमधील रहस्य आणि कहाणी नक्की कशी असणार आहे हे येत्या ९ मे ला समजेलच.

हा चित्रपट ब्रिटिश काळातील ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. ही एक संगीतप्रधान कथा असून, प्रेम, विश्वासघात आणि जगण्याच्या जिद्दीचा अद्भुत प्रवास मांडते.

चित्रपटात पद्मराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेप प्रमुख भूमिकेत आहेत, तसेच मराठीतील अनेक दिग्गज कलाकारही यात सहभागी आहेत. या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन पद्मराज राजगोपाल नायर यांनी केलं आहे.

# पिंपळस-येवला, लासलगाव-खेडलेझुंगे रस्त्याच्या कामांचा माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्याकडून आढावा

**नाशिक ।** पिंपळस ते येवला या ५६० कोटी रुपयांच्या तसेच लासलगाव ते खेडले झुंगे या १३४ कोटी रुपयांच्या चौपदरी रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामांना अधिक गती देऊन नियोजित वेळेत काम पूर्ण करण्यात यावे अशा सूचना राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पिंपळस ते येवला या ५६० कोटी रुपयांच्या तसेच लासलगाव ते खेडले झुंगे या १३४ कोटी रुपयांच्या चौपदरी रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या सुरू असलेल्या कामांचा आज नाशिक येथील कार्यालयात अधिकाऱ्यांसमवेत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उदय पालवे, उपअभियंता अविनाश देवरे, उपअभियंता प्रकाश घोडे, शाखा अभियंता गणेश चौधरी, संकेत चौधरी, रेखा शेळके,



मयूर मोहिते, कंत्राटदार अभय चौकसी, अनिल काळे यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले की, पिंपळस ते येवला व लासलगाव ते खेडलेझुंगे रस्त्याच्या कामांना अधिक गती देऊन नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे. पावसाळ्याच्या आत जास्तीत जास्त काम पूर्ण करण्यात यावे. कामाला अधिक गती देण्यासाठी कामगारांची तसेच मशिनरीची संख्या दुपटीने वाढवून कामास गती देण्यात यावी. तसेच या कामाला गती न मिळाल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशा सूचना देखील अधिकाऱ्यांना दिल्या. आगामी कुंभमेळ्याच्या धर्तीवर हे काम कुठल्याही परिस्थितीत नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. लासलगाव खेडले झुंगे रस्त्याच्या कामाला खेडले परिसरात ज्या प्रमाणात गतीने काम सुरू आहे. त्याच गतीने लासलगाव विंचूर या बाजूने रस्त्याचे काम सुरू करून अपघाताचे प्रमाण जास्त असल्याने हे काम प्राधान्याने घेऊन सुरू करण्यात यावे. या रस्त्याच्या अंतर्गत असलेल्या पुलांची कामे देखील जलद गतीने पूर्ण करण्यात यावी. रस्त्याचे काम सुरू असताना वाहतूक सुरळीत राहण्यासाठी देखील सुयोग्य नियोजन करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी केल्या. लासलगाव बाह्यवळण रस्त्याच्या कामाला देखील अधिक गती देऊन पुढील चार महिन्यात हे काम पूर्ण करण्याबाबत प्रयत्न करण्यात यावे. तसेच शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात याव्यात अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. यावेळी पिंपळस ते येवला या रस्त्यावरील १० किलोमीटर रस्त्याचे काम ३० मे पर्यंत पूर्ण करण्यात येईल तसेच खेडले ते लासलगाव रस्त्याचे काम नियोजित वेळेपूर्वी पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी दिली.

## महत्त्वाचे

### पहलगाममधील घटनेचा एम.व्ही.पी.एस. विधी विद्यालयाकडून तीव्र निषेध

**नाशिक ।** पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या बेछूट गोळीबाराच्या घटनेचा मराठा विद्या प्रसारक समाज विधी विद्यालयातर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या



निषेध आंदोलनात विधी महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनादरम्यान निषेधाचा जोरदार आवाज उठवण्यात आला आणि दहशतवाद्यांविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या वेळी विधी विद्यालयाच्या प्राचार्य संध्या गडाख यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना, पहलगाममधील या हिंसक घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, "या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जावी." तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी केंद्र व राज्य शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशीही त्यांनी मागणी केली.दरम्यान संपूर्ण शिक्षकवृंद व विद्यार्थी वर्गाने एकजूट दाखवत देशातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### पहेलगाम हल्लाप्रकरणी ठाणगाव ग्रामस्थांतर्फे मूक मोर्चा

**सिन्नर ।** तालुक्यातील ठाणगाव येथे जम्मू कश्मीर पहेलगाम येथे भारतीय नागरिकांवर हल्ला प्रकरणी ठाणगाव ग्रामस्थांच्या वतीने जाहीर मूक मोर्चा काढण्यात आला. यावेळी पहेलगाम अतिरेकी



हल्ल्या मध्ये मृत्यू पावलेल्या 27 व नागरिकांना ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. गावामधून बस स्टॅन्ड ते मारुती मंदिर पटांगण मध्ये मोर्चाचा समारोप करण्यात आला. यावेळी मोर्चात सहभागी नागरिक बबनदादा काकड, रामदास भोर, अध्यक्ष राजेंद्र काकड, नामदेव शिंदे, विलास मोरे, अमित पानसरे, रोहन शिंदे, मोहन आव्हाड, गणेश शिंदे, प्रतीक शिंदे, उमेश काकड, संजय शिंदे, रामदास शिंदे, शांताराम शिंदे, सुभाष शिंदे, डॉ बाळासाहेब केदार, के. ए. शिंदे, सोमनाथ शिंदे, भाऊसाहेब शिंदे, यशवंत जगताप, बाळासाहेब काकड, सागर काकड, दिलीप काकड, गौतम काकड, सूर्यभान शिंदे, पंढरी शिंदे, राहुल केदार, दौलत कर्डिले, सुदाम शिंदेंसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. रिटायर फौजी रोहन शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या नागरिकांना धर्म विचारून अतिरेक्यांनी गोळ्या घातल्या, इथून पुढेही आपल्या गावामध्ये, कोणी बाहेरचा व्यक्ती आढळल्यास ग्रामपंचायतीला त्यांची व्यवस्थित माहिती घेऊन चौकशी करावी, संपूर्ण भारत देशाला दुःख झालेलं आहे, सर्व देश देशातल्या नागरिकांनी आता सतर्क राहिले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### बावनकुळे यांना राष्ट्रीय छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवाचे निमंत्रण

**धुळे ।** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची राष्ट्रीय जन्मोत्सव जयंती सोहळा नवी दिल्ली महाराष्ट्र सदन येथे १४ में २०२५ रोजी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावळ, आमदार अनुप अग्रवाल, धुळ्याचे माजी महापौर नाना कर्पे, उद्योजक निखिल देवरे यांना धुळे येथे देण्यात आले. यावेळी छावा भारत क्रांती मिशनचे मुख्य समन्वयक डॉ विलास भाऊ पांगारकर, किशोर चव्हाण, रवींद्र पवार, अक्षयराजे ताठे आदी उपस्थित होते.

### केटीएचएम महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन

**नाशिक ।** पुस्तकांचे वाचन केल्यामुळे आपला शब्दसंग्रह वाढतो, भाषा, संवाद कौशल्य सुधारतात, पुस्तक वाचनामुळे आपल्याला एकाग्र होण्यास मदत होते. त्यामुळे तणाव कमी होतो व आपल्या ज्ञानातही वाढ होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी केले. जागतिक पुस्तक दिनानिमित्त केटीएचएम महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे आयोजित पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहाय्यक ग्रंथपाल स्मिता पिंगळे, एस. पी. पवार, दीपाली निरगुडे, प्रा. स्मिता घोरपडे, प्रा. कीर्ती देवरे उपस्थित होते.




# पुणेगाव कालव्याच्या चौकशीचा फार्स

## दोषी अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न



पुणेगाव डावा कालवा
पंचनामा
सुधीर उमराळकर

**नाशिक ।** सिंचन विभागातील पुणेगाव डाव्या कालव्याच्या संदर्भात झालेल्या कामांच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणी प्राधिकरण अहिल्यानगर यांनी प्रस्तावित केलेली चौकशी तक्रारदाराने अमान्य केली आहे. भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी प्राधिकरणाने त्याच विभागातील अधिकाऱ्याची नेमणूक केल्याने दोषी अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या चौकशीचा केवळ फार्स असून कुठलेही सत्य बाहेर येणार नसल्याने या भ्रष्टाचाराची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणी संबंधित तक्रारदार यांनी केली आहे. तसे न झाल्यास मंत्रालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही तक्रारदारांनी दिला आहे.

सिंचन विभागातील नांदूर मध्यमेश्वर प्रकल्प विभागा अंतर्गत येणाऱ्या पुणेगाव डाव्या कालव्याच्या कामात कार्यकारी अभियंता मनोजकुमार डोकचोळे आणि उपअभियंता योगिता घुगे यांनी मार्च एंडच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची बिलं दाखल करून त्यापैकी ८ कोटी रुपयांची बिले मंजूर करून घेतली. या भ्रष्टाचाराबाबत अध्याप पर्यंत कुठलीही चौकशी करण्यात आली नव्हती, मात्र तक्रारदाराच्या रेट्या त्यामुळे अखेर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सहाय्यक अभियंता आर.आर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.चौकशी अधिकारी हे त्याच विभागातील असल्याने भ्रष्ट अधिकारी आणि त्यांच्या कारस्थानातला पाठीशी घालण्याचा किंवा दोषी अधिकाऱ्यांना चौकशीमध्ये वाचविण्याची पूर्ण शक्यता असल्याने प्राधिकरणाने आदेश दिल्याप्रमाणे चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती रद्द करून त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान या प्रकरणातील सत्य बाहेर येऊन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होण्यासाठी तक्रारदाराने पाउले उचलली असून लवकरच मुख्यमंत्री, मुख्य सचिव, तसेच जलसंपदा विभागाचे मुख्य सचिव आणि विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांना समक्ष भेटून प्रकरणातील सत्यता आणि पुरावे देण्यात येतील अशी माहिती तक्रारदाराने दिली आहे. या प्रकरणी भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास आगामी अधिवेशना दरम्यान थेट विधिमंडळासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा तक्रारदाराने दिला आहे.

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**

## कर्ज परतफेडीबाबत शेतकऱ्यांनी घेतली नरहरी झिरवळ यांची भेट



**नाशिक ।** जिल्हा सहकारी बँकेची सक्तीचे कर्ज वसुली बंद करा व शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करा. तसेच कर्जमाफीला उशीर होत असेल, तर शेतकऱ्यांना संपूर्ण व्याज सवलत देऊन मुद्दलाचे दहा हप्ते करून द्यावेत, अशी मागणी आज एका निवेदनाद्वारे अन्न व प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांना देण्यात आली.

यावेळी शासनाने कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेवर दोन टक्के तीन टक्के व पाच टक्के अशा पद्धतीने व्याज आकारणी करणार असल्याचे नरहरी झिरवळ यांनी सांगितले. मात्र अजून तसा शासन निर्णय झाला नसून आपली मागणी मी पुन्हा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे मांडून राज्य शासनाचे राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्याकडे मांडून आपल्या मागणीचा विचार करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करेन, असे आज निवेदनावर उत्तर देताना नामदार झिरवळ यांनी सांगितले. आपल्या निवेदनात शेतकरी समन्वय समितीचे भगवानराव बोराडे, 938 आदिवासी कार्यकारी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, दिलीप पाटील, बाळासाहेब बोरस्ते, रमेश बोरस्ते, दगाजी अहिरे, आनंदा चौधरी यांनी शासकीय विश्रामगृह नाशिक येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. नाशिक येथे 11 एप्रिल रोजी बैठक होऊन बँकेबाबतीत सविस्तर चर्चा करून ती मागणी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व नाशिक जिल्ह्याच्या लोकप्रतिनिधी समोर ठेवून शेतकऱ्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करू असे सांगितले होते. त्यानुसार 18 एप्रिल रोजी माणिकराव कोकाटे यांच्या दालनात मुंबई येथे मंत्रालयात बैठक होऊन त्या ठिकाणी चर्चा करण्यात आली. 23 एप्रिल रोजी अजितदादा पवार यांनी मंत्रालयात बैठक घेऊन सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, शिक्षण मंत्री दादा भुसे तसेच नाशिक जिल्ह्यातील आमदार व सहकार विभागाचे अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन एक लाखापर्यंत दोन टक्के, पाच लाखापर्यंत तीन टक्के, दहा लाखापासून पुढे पाच टक्के व्याज आकारण्यात येईल अशा पद्धतीने या ठिकाणी चर्चा करण्यात आली. जे शेतकरी लवकरात लवकर कर्ज भरतील त्यांच्या बाबतीत सुद्धा व्याज माफीचा निर्णय घेणे संदर्भात मी अजितदादां बरोबर चर्चा करेल असे झिरवळ यांनी या चर्चेदरम्यान शेतकरी समन्वय समितीच्या व इतर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर चर्चा करताना सांगितले.

## सामाजिक क्रांतीचा इतिहास समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी फुले चित्रपट महत्वाचा : भुजबळ

### चित्रपटाच्या 'विशेष शो'ला फुले प्रेमींची मोठी गर्दी

**नाशिक ।** फुले दांपत्याच्या सामाजिक क्रांतीचा इतिहास समाजापर्यंत पोहचविण्यासाठी फुले चित्रपट अतिशय महत्वाचा असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी यांनी केले.

महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने नाशिकच्या सिटी सेंटर येथील चित्रपट गृहात फुले चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास खैरे यांनी या 'शो'चे आयोजन केले होते.

यावेळी आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, डॉ.शेफाली भुजबळ, प्रदेश पदाधिकारी बाळासाहेब कर्डक, नानासाहेब महाले, शहराध्यक्षा कविताताई कर्डक,महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास खैरे, कार्याध्यक्षा जयश्री काठे, समाधान जेजुरकर, आशा भंदूरे, रवी हिरवे, संदीप गांगुर्डे, संदीप खैरे, नाना साबळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले की, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित याआधी मराठी चित्रपट प्रदर्शित झालेले आहे. आचार्य अत्रे यांनी काढलेल्या





महात्मा फुले यांच्या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. आता प्रथमच हिंदी चित्रपट प्रदर्शित झाला आहे. त्यामुळे देशभरात तसेच देशाबाहेर देखील हा चित्रपट बघितला जाईल त्यातून इतिहास समाजापर्यंत पोहचेल. त्यामुळे हा चित्रपट सर्वांनी पाहणे गरजेचे आहे असे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले की स्त्री शिक्षणा सोबतच बालहत्या प्रतिबंध, केशवपण परंपरेला विरोध यासह अनेक महत्वाच्या सामाजिक सुधारणा फुले दांपत्याने केल्या. ज्यावेळी समाजातून तीव्र विरोध होत असताना त्यांनी हा विरोध झुगारून सामाजिक क्रांतीचे पाऊल टाकले. आज परिस्थिती बदलली आहे. मात्र त्या काळातील इतिहास सर्व समाजापर्यंत जाणे तितकेच आवश्यक आहे. इतिहासाचा अभ्यास केला तरच पुढील वाटचाल ही अधिक सुकर होत असते. त्यामुळे हा इतिहास चित्रपटाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# महावितरणचा गलथान कारभार उघड; उकाड्यात वीज गायब, नागरिक संतप्त

## देवळाली कॅम्प मपरिसरात आठ-दहा तास वीज गायब; कार्यालयात नोकरशहा गायब

**देवळाली कॅम्प ।** एप्रिल महिन्याच्या कडक उन्हात होरपळणाऱ्या देवळाली कॅम्प परिसरातील नागरिकांना महावितरणच्या बेफिकीर कारभाराचा मोठा फटका बसत आहे. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहोचले असतानाही महावितरण कडून वेळोवेळी वीजपुरवठा खंडित करण्यात येत असून, नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही.

शुक्रवारी, २५ एप्रिल रोजी लॅम रोड परिसरात सकाळी ८ वाजल्या पासून संध्याकाळी ४ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित होता. त्याच प्रमाणे शनिवारी, २६ एप्रिल रोजी संसरी गावात सकाळी ८ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वीज गायब होती. अचानक वीज गायब झाल्याने नागरिक, व्यापारी वर्ग आणि विद्यार्थी मोठ्या अडचणीत सापडले.

**वीजबिलासाठी तगादा, सेवेत शून्यपणा**

महावितरण कंपनी नागरिकांकडून नियमितपणे वीजबिल वसूल करते, बिल भरायला उशीर झाला तर व्याजही आकारते. मात्र, जेव्हा नागरिकांना अखंड वीजपुरवठ्याची मूलभूत सेवा द्यायची वेळ येते तेव्हा महावितरण कंपनी मात्र झोपलेलीच असते, अशी जोरदार टीका होत आहे.






**कार्यालय ओसाड, अधिकारी गायब**

शनिवारी दिनांक २६ एप्रिल रोजी आमचे प्रतिनिधी भैयासाहेब कटारे यांनी देवळाली कॅम्प मधील महावितरणच्या कार्यालयाला भेट दिली असता, संपूर्ण कार्यालय ओसाड आढळले. एकही कर्मचारी कार्यालयात उपस्थित नव्हता. विशेष म्हणजे, अभियंता कार्यालयालाही कुलूप होते. विद्युत अभियंता जायभावे यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्या वतीने दुसऱ्याच व्यक्तीने फोन उचलला आणि उडवाउडवीची उत्तरे दिली.

**नागरिकांचा संतापाचा उद्रेक**

"राज्य शासन करदात्यांच्या पैशातून अशा कामचुकार कर्मचाऱ्यांना पगार का देते?" असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. पावसाळा काही महिन्यांवर येऊन ठेपला असताना, आवश्यक झाडांची छाटणी व विद्युत तारांचे देखभाल काम सुरू करण्याची गरज आहे. मात्र महावितरण कडून कोणतीही पूर्वकल्पना न देता कामे केली जात आहेत, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### 'तुपाशी कर्मचारी, उपाशी जनता'

देवळाली कॅम्प परिसरात सध्या महावितरणच्या बेजबाबदार कारभारा मुळे 'तुपाशी कर्मचारी आणि उपाशी जनता' असे विदारक चित्र पाहायला मिळत आहे.

**- भगवानदास कटारिया सामाजिक कार्यकर्ते, देवळाली कॅम्प**

# दशकपूर्ती महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची!

**राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने लोकसेवा देता याव्या यासाठी शासनाने 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' लागू केला आहे. यामुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित झाली आहे. हा अधिनियम २८ एप्रिल २०१५ रोजी अंमलात आला असून राज्यात हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्त हा विशेष लेख.**

---------------

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा कायदा राज्यातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कायद्याची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे. हा अधिनियम संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार पात्र असलेल्या व्यक्ती व लोकसेवा देणारी सार्वजनिक प्राधिकरणे यांना लागू होतो. तसेच, या अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या सर्व सेवांसाठी हा कायदा लागू आहे.

या कायद्याचा मुख्य उद्देश हा पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम आणि वेळेत लोकसेवा पुरवणे आहे. यासोबतच, लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे हे देखील या कायद्याचे उद्दिष्ट आहे.

एखाद्या व्यक्तीची पात्रता संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार ठरविली जाते. विशेष म्हणजे, या कायद्यानुसार सार्वजनिक सेवा मिळवण्यासाठी कोणताही पात्र व्यक्ती अर्ज करु शकते. परदेशात राहणारी एखादी व्यक्ती कोणत्याही अधिसूचित सेवेसाठी पात्र असेल, तर तीदेखील या कायद्यानुसार सेवा प्राप्त करू शकते.

गेल्या दहा वर्षात १८ कोटींपेक्षा अधिक अर्जदारांनी या अधिनियमानुसार अधिसूचित सेवा मिळविल्या आहेत. आपले सरकार पोर्टल यांसारख्या उपक्रमांनी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात सुलभता आणली आहे. सर्व विभागांच्या मिळून एक हजारपेक्षा जास्त सेवा अधिसूचित असून त्यापैकी त्यापैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध आहेत. एकूण १ कोटी पेक्षा अधिक नागरिकांनी आपले सरकार पोर्टलवर रजिस्ट्रेशन केले आहे.

सेवेचा अधिकार म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या वेळेत लोकसेवा मिळवण्याचा हक्क. सार्वजनिक प्राधिकरणात शासनाचे विभाग, विविध सरकारी संस्था, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या अशासकीय संस्था यांचा समावेश होतो. प्रत्येक सेवेसाठी कालमयार्दा निश्चित करण्यात आली आहे. या कायद्याची आणि नियमांची प्रत 'आपले सरकार' पोर्टल किंवा 'आरटीएस महाराष्ट्र' मोबाईल ॲपवरून विनामूल्य डाउनलोड करता येते.

**सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका :**

या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अधिसूचित सेवा आणि त्यासंबंधीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य आहे.

यासाठी, राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करण्यात येते. सार्वजनिक प्राधिकरणाने पुरविलेल्या लोकसेवांची यादी, त्यासाठी लागणारा वेळ, विहित शुल्क, पदनिर्देशित अधिकारी आणि अपील प्राधिकाऱ्यांचे तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि त्यांच्या वेबसाइटवर किंवा पोर्टलवर दर्शविण्यात येतात. ही माहिती प्रदर्शित केली नाही, तर मुख्य आयुक्त किंवा संबंधित आयुक्त स्वतः दखल घेऊन कारवाई करू शकतात.

लोकसेवा मिळवण्यासाठी आवश्यक असणारी विविध प्रमाणपत्रे, कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे कमी करण्यावर या कायद्यात भर देण्यात आला आहे.

**अर्ज कुठे करावा?**

लोकसेवा मिळवण्यासाठी अर्जदारास पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे, प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन किंवा 'आपले सरकार सेवा पोर्टल' वरून ऑनलाईन अर्ज करता येतो. प्रत्येक विशिष्ट सेवेसाठी अर्ज करण्याचा नमुना वेगळा असतो. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची यादी संबंधित कार्यालयात, 'आपले सरकार सेवा केंद्रां'मध्ये आणि संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते.

**ऑनलाईन अर्ज सुविधा:**

'आपले सरकार सेवा पोर्टल' हे विविध विभागांच्या लोकसेवांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी एक सामान्य व्यासपीठ आहे. जे नागरिक स्वतःहून अर्ज करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी राज्यभरात ३२००० हून अधिक 'आपले सरकार सेवा केंद्रे' कार्यरत आहेत.

याव्यतिरिक्त, 'आरटीएस महाराष्ट्र' नावाचे मोबाईल ॲपदेखील वापरकर्त्यांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. प्रत्येक ऑनलाईन अजार्ला एक विशिष्ट ओळख क्रमांक (युनिक आयडेंटिफिकेशन नंबर मिळतो, ज्यामुळे अर्जाच्या प्रगतीचा मागोवा घेणे सोपे होते.

जर एखाद्या पात्र व्यक्तीला विहित वेळेत सेवा मिळाली नाही किंवा तिचा अर्ज फेटाळला गेला, तर ती व्यक्ती प्रथम अपील प्राधिकरणाकडे अपील करू शकते. प्रथम अपील अर्ज सेवा नाकारल्याच्या किंवा विहित कालमयार्दा संपल्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत दाखल करता येतो.

मात्र, जर अर्जदाराकडे वेळेत अपील न करण्याचे योग्य कारण असेल, तर प्रथम अपील प्राधिकरण विलंब माफ करून ९० दिवसांत अपील स्वीकारू शकते. अपील सुनावणीची नोटीस अर्जदाराला प्रत्यक्ष, नोंदणीकृत पोस्टाने, ईमेलद्वारे, एसएमएसद्वारे किंवा मोबाईल ॲपद्वारे दिली जाते.

**आपले सरकार सेवा केंद्र :**

'आपले सरकार सेवा केंद्रे' ही नागरिकांना सार्वजनिक सेवा मिळविण्यासाठी मदत करतात. ही केंद्रे तहसील, ग्रामपंचायती, नगरपालिका, आणि काही खाजगी ठिकाणीही उपलब्ध आहेत. ही केंद्रे आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सर्व विभागांच्या सेवा पुरवतात.

**लोकसेवेत कसूर झाल्यास कारवाई**

या अधिनियमात लोकसेवा पुरविण्यात किंवा अपिलांवर निर्णय घेण्यात अधिकाऱ्यांकडून कसूर झाल्यास दंडात्मक कारवाईची स्पष्ट तरतूद आहे.

**पदनिर्देशित अधिकाऱ्यावरील दंड:**

जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने विहित वेळेत योग्य कारणाशिवाय लोकसेवा दिली नाही, तर त्याच्यावर कमीतकमी ५०० ते कमाल ५ हजार रूपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो. प्रथम अपील प्राधिकारी सुनावणीनंतर हा दंड लावू शकतात.

वारंवार लोकसेवा देण्यात दिरंगाई झाल्यास किंवा अपील प्राधिका?याच्या निदेशांचे पालन न केल्यास, संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई देखील केली जाऊ शकते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि शासकीय कामांमध्ये पारदर्शकता आणणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावणे आवश्यक आहे. नागरिकांनी देखील आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून या कायद्याचा योग्य वापर केल्यास त्यांना वेळेत आणि पारदर्शकपणे लोकसेवा मिळू शकेल.

--------------

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.**

●●●●●

# राजकारणाच्या जात्यात शिक्षणाचा चुरा...



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर**
**९१३०९७९३००**

सध्या देशातील व राज्यातील राजकीय वातावरण बघितले तर खुप गलिच्छ झाले आहे. राज्यकर्ते व राजकीय लोकांनी सर्वसामान्य लोकांचा विकास, शिक्षण, आरोग्य, रोजगार व देश उभारणी साठी तरुणांच्या डोक्यात सुपिक विचाराची पेरणी करून लोकशाहीला बळकट करण्याचे काम करणे आवश्यक असताना आणि आणि बहुसंख्य राजकीय लोक अल्पशिक्षित असताना हे लोक मुख्य मुद्दा बाजूला सारून, धर्म, जातीय, इतिहास यावर चुकिच्या पद्धतीने बोलुन देशातील सामाजिक वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

ज्यांना शिक्षणाचा गंधच नाही त्यांनी इतिहास व धर्मावर बोलणे म्हणजे इतिहासाची तोडफोड व धमार्ची विटंबना आहे पण हेच बहुतांश भक्तांना कळतच नाही. कधी मंदिर मशिदीच्या नावाखाली, तर कधी जाती धर्माच्या नावाखाली, तर कधी कबरीच्या नावाखाली माणसाला माणसापासून दुर करण्याचे काम सत्तेतील लोकांकडून होत असेल तर देश विकसित नाही तर उद्धस्त होत आहे असे दिसून येते.

माणसाला माणसा पासून दुर करण्यासाठी राजकीय लोक नको तो मुद्दा उकरून काढतात आणि इलेक्ट्रॉनिक स्ट्रीम मिडिया त्या मुद्दाला उचलून धरून तोच सर्वात ज्वलंत मुद्दा आहे असे दाखवून आपली लाचारी व गुलामी सिद्ध करून देतात. म्हणून भारतीय मिडीयाचे स्थान जागतिक स्तरावर कुठे आहे हे सांगण्याची गरज आहे. सत्ताधारी असो वा विरोधी असो कोणताही राजकीय नेता कधीच सर्वसामान्य मानसाच्या विकासाच्या, शिक्षणाच्या, रोजगाराच्या, आरोग्य सुविधा यावर बोलताना दिसत नाहीत आणि मिडिया ला तर या विषयावर चर्चा करायला वेळच नाही. अशा प्रकारच्या गलिच्छ राजकारणात मात्र शिक्षणाचा चुरा होत आहे.

तरुण वेगवेगळ्या दंगली मध्ये, आंदोलनामध्ये जेल मध्ये जात आहेत अधिकारी होण्याची क्षमता असलेले तरुण भिकारी होत आहे तरीही राजकीय नेत्यांना तरुणांच्या भविष्याची काळजी नाही. कारण राजकीय नेत्याच्या घरात कोणतीही समस्या नाही. नेत्याची लेकरं विदेशात जाऊन शिक्षण घेतात त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेसह इतरही भाषा अवगत असतात परंतु सर्वसामान्य मानसाच्या शिक्षणाचा प्रश्न येतो तेव्हा भाषेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करून शिक्षणाची थट्टा केली जाते.

शिक्षण मराठीत असायला पाहिजे की इंग्रजी मध्ये पाहिजे, आता तर हिंदीचा ही वाद जाणीवपूर्वक पेटवून मुळ मुद्यावरून लक्ष विचलित करण्याचे काम केले जात आहे. हिंदी भाषेविषयी सध्या प्रचंड गदारोळ सुरू आहे. या गदारोळाचा, या चचेर्चा शिक्षणावर व शिक्षणाच्या गुणवत्तेवर तिळमात्र ही फरक पडणार नाही. याचे कारण आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू होऊन अनेक दिवस होऊन गेले. इंग्रजी शाळेच्या फि हजारो लाखों रुपये प्रतिवर्षे आहे. इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अजून बरोबर इंग्रजी बोलता आली नाही आणि यांनी नवीन हिंदीचा मुद्दा उपस्थित करून शिक्षण क्षेत्रात स्वतः ला तज्ञ समजणारे लोक शिक्षणाची चिंधी करताना दिसत आहेत.

खरं तर हिंदी भाषेचा मुद्दा चचेर्चा विषयच नाही. मुळ मुद्यावरून लक्ष हटविण्यासाठी सरकारने हिंदीचा चेंडू फेकला आणि बाकीचे विरोधक त्या भोवती खेळत आहेत. ज्याला जी भाषा समजले त्या भाषेतून, ज्या भाषेचा फायदा जागतिकीकरणात टिकण्यासाठी व रोजगार निर्मिती साठी आवश्यक असेल त्या भाषेत शिक्षण द्यायला काहीच हरकत नाही. पण कोणत्याही भाषेतून शिक्षण देताना शिक्षणामध्ये गुणवत्ता पाहिजे यावर मात्र कोणीच बोलत नाही.

शिक्षणात विज्ञानवाद असावा, तर्कवाद असावा, शिक्षणात कौशल्य असावे, शिक्षणाच्या माध्यमातून रोजगार व नोकरी यावर मात्र सत्ताधारी वा विरोधक कोणीच बोलत नाही. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता कमी झाली आहे. गुणवत्तेवर कोणाचेही लक्ष राहीले नाही. विज्ञानाचा शिक्षण अज्ञाना सारखे वागत आहे. काही नेते तर नालीच्या पाण्यातुन गॅस तयार करतात, एवढेच नव्हे तर गॅसच्या फुग्यात बिया टाकुन वृक्षारोपण करतात, आईच्या पोटी जन्म घेऊन आपला जन्म जैविक नाही असे म्हणतात, काही लोक प्रत्येक आजारावर गोमूत्र एकमेव उपाय आहे म्हणून गोमूत्र व शेण खाण्यापिण्याचे सल्ले देतात आणि येथील सुशिक्षित समजणारा वर्ग ते ऐकून घेत असेल तर देशात शैक्षणिक गुणवत्ता किती आहे याची जाणीव होते.

कोणताही राजकीय नेता इंग्रजी माध्यमांच्या शाळेची फी एवढी महाग कशी यावर कोणीही बोलायला तयार नाही. बऱ्याच लोकांची वर्षाची कमाई नाही तेवढी एका वषार्ची शाळेची फि आहे. इतर खर्च वेगळाच. मग सर्वसामान्य लोकांनी आपल्या मुलांना कसे शिकवायचे?

जशी आर्थिक विषमता निर्माण झाली आहे तशीच शैक्षणिक विषमता निर्माण झाली आहे. गोरगरीब लोकांची वेगळी शाळा, श्रीमंत लोकांची वेगळी शाळा असे वातावरण निर्माण केले आहे. पण गोरगरीब दोघांची मुलं एकाच छताखाली आजही का शिकत नाहीत? यावर मात्र सर्वांची चुप्पी आहे.

प्रत्येक राजकीय नेता फक्त स्वतःच्या फायद्याचे व जनतेची दिशाभूल करण्याचे राजकारण करत आहेत. परंतु यामध्ये सर्व सामान्य माणसाच्या लेकाराच्या शिक्षणाचा चुरा होत आहे. यावर मात्र कोणी बोलत नाही. मिडिया चर्चा घडवून आणत नाही. याचाच परिणाम राजकीय नेते स्वतः ची झोळी भरून जनतेला, जनतेच्या प्रश्नांना व जनतेच्या शिक्षणाला वाऱ्यावर सोडत आहे. ही खुप गंभीर बाब आहे.

शिक्षण कोणत्या भाषेत द्यायला पाहिजे या अगोदर शिक्षणात कोणकोणत्या घटकांचा समावेश पाहिजे, सर्वांना कोणत्याही शाळेत प्रवेश घेता येईल अशी फी व्यवस्था, फी भरूनही विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस लागते कि नाही याची समीक्षा, पैशाने विकत शिक्षण घेऊनही भविष्यातील नोकरीची हमी या बाबींवर चर्चा व समीक्षा होणे आवश्यक आहे.


परंतु राजकीय नेते हे सर्व सामान्य जनतेच्या विकासाचे, कल्याणाचे राजकारण करत नाही म्हणून सर्वसामान्य लोकांचे भविष्य उद्धवस्त होऊन नको त्या विषयावर नको तेव्हा चर्चा करून चुकिची माहिती पेरण्याचे काम केले जाते. शिक्षण घेऊनही तरुण बेरोजगार म्हणून फिरत आहेत, दरवर्षी वेगवेगळ्या गुन्ह्यात हजारो तरुण जेलमध्ये जात आहेत, यावर मात्र चर्चा घडत नाही. चर्चा घडते ती जातीवर, धर्मावर, मंदिरावर, मशिदीवर परंतु झाडाला फाशी घेणाऱ्या शेतकऱ्यांवर किंवा आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे काय? भविष्यात शेतकरी आत्महत्या करणार नाहीत यावर उपाययोजना म्हणून चर्चा का होत नसेल?

प्रत्येक क्षेत्रातील लोक आत्महत्या करत आहेत परंतु राजकीय क्षेत्रातील लोक आत्महत्या हत्या का करत नाहीत यावर मात्र स्ट्रीम मिडियाला चर्चा करायला वेळच कुठे आहे? याचाच परिणाम म्हणून देशातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या अधिक जटिल होत आहेत.

विद्यार्थी, सुशिक्षित तरुण यांच्या वर उपासमारीची वेळ येत आहे. मुळ समस्या बाजूला सारून सरकारचा प्रवक्ता म्हणून महत्वाची भुमिका बजावणारा मिडिया खरचं सर्वसामान्य जनतेची विद्यार्थ्यांची बाजू उचलून न्याय देईल हि अपेक्षा फोल आहे. म्हणून शिक्षण, रोजगार, कृषी प्रत्येक क्षेत्रात सर्वसामान्य लोकांचा चुरा आहे. आणि हिच लोकशाही मधील शोकांतिका आहे.

■ ■ ■

# युगपुरूषाच्या परिवर्तनाच्या प्रवासाचा साक्षीदार ठरणारा दस्ताऐवज : फुले




**प्रा. श्रीकृष्ण बनसोड, समाजभूषण**
**संपादक, वऱ्हाड विकास**
**किशोर नगर,**
**अमरावती. ९७६३४०३७४८**

महात्मा जोतीराव फुले यांच्या बाबतीत सन १९२४ ते १९२७ दरम्यान पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी गावागावांत फिरुन माहिती संकलित केली. त्याच्याच आधारे आचार्य प्र. के. अत्रे यांनी ३० जानेवारी १९५४ रोजी म. फुलेंवर बोलपट प्रदर्शित केला. त्याच्या प्रदर्शनाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. त्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर तब्बल ७० वषानंतर समता फिल्मस आणि अमिता फिल्मप्रोडक्शन प्रा. लि. च्यावतीने सत्यशोधक नावाचा मराठी चित्रपट श्री. निलेश रावसाहेब जळमकर यांनी दिग्दर्शित केला.

आता २५ एप्रिल २०२५ रोजी झी स्टुडिओज प्रस्तुत डॉसिंग शिवा फिल्मस आणि किंग्समेन प्रोडक्शन्स फिल्म निर्मित व राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनंत नारायण महादेवन दिग्दर्शित फुले हा हिंदी चित्रपट महाराष्ट्रासह इतरही राज्यात प्रदर्शित करण्यात आला. प्रणय चौकशी, जगदिश पटेल, रितेश कुडेचा, अनुया चौहान कुडेचा, सुनील जैन, डॉ. राज खवाडे हे निर्माता तर क्रांती शानबाग, कलापी नागदा हे सहनिर्माते आहेत.

सामाजिक क्रांतिचे आद्य प्रणेते महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण, जाती निर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ ह्या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहेत. सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या ह्या क्रांतिकारी दाम्पत्याच्या प्रेरणादायी जीवन कहाणीला प्रथमच हिंदी भाषेतून रुपेरी पडद्यावर मांडण्यात आले आहे, त्यामुळे आजच्या पिढीला इतिहासाची जाणीव करुन देतानाच नव्या विचारांची दारे उघडणारा हा चित्रपट ठरणारा आहे.

जोतीबांच्या भुमिकेत स्कॅम १९९२ फेम प्रतीक गांधी यांनी जीव ओतला तर सावित्रीबाईंच्या भुमिकेत अभिनेत्री पत्रलेखा यांनी समर्थपणे साथच दिली नाही, तर काही प्रसंगातून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व समर्थपणे सिध्द केल्याचे दिसते. सावित्रीबाईंची बालपणीची भूमिका राधा धारणे ह्या बाल कलाकार मुलीने साकार करतांना अभियनाची चुणूक दाखविली.

महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांची दैन्यावस्था घालविण्यासाठी फुलशेतीला प्राधान्य दिले. त्या प्रसंगाने फुले चित्रपटाची सुरुवात करुन प्रेक्षकांना सुखद अनुभूती देण्यात आली. त्यानंतर जोतिबांचा ब्राम्हण मित्र परांजपेच्या लग्नात झालेला अपमान त्यांच्या जिव्हारी लागला, त्यातून क्रांतिकार्य गतीशील होत गेले.

शुद्रांना हात लावल्याने पाप लागते. त्यांच्या सावलीचा उच्चवर्णीयांना विटाळ होतो. मुलींना शिकवून तू क्रांती करणार? हा धर्म आणि सत्याचा मार्ग नव्हे, असे मुलगा व सुन यांना सांगतांना गोविंदराव फुले यांच्या मनातील घालमेल प्रभावीपणे दाखविण्यात आली. त्यावर फ्रान्समधील अन्याय-अत्याचार व जुल्म आणि शोषण करणारी राज्यक्रांती ही तेथील मागासवर्गीयांनी हाणून पाडली, हे जोतीरावांचे कणखर उत्तर त्यांच्या पुढील सामाजिक क्रांतीचे सुतोवाच करते.

फुले दाम्पत्यांच्या मुलींच्या शाळेक शिकवित असतांना शिक्षिका सावित्रीबाई यांना केलेली मारहाण, शैक्षणिक साहित्याची केलेली तोडफोड, सावित्रीबाईंनी शिक्षणाच्या कायार्पासून परावृत्त व्हावे म्हणून त्यांच्यावर केलेला शेण गोळ्यांचा मारा, जोतिबांच्या खुन करण्यासाठी पाठविलेले भाडोत्री मारेकरी इ. घटनातून सामान्य माणसांना मनात चीड निर्माण होते.

वस्ताद लहुजी साळवे व मारेकरीचे केलेले मनपरिवर्तन, जोतिबांचा ह्यमहात्माह्न म्हणून केलेला गौरव इत्यादि प्रसंग हे मनाला सुखावून जातात. तेव्हा महात्मा फुले यांनी केलेल्या भाषणातून त्यांची समाजासाठी झटण्याची-झिजण्यासाठी त्यांची भूमिका ही प्रेरणा देणारी आहे. विधवा काशिबाई सह इतरही ब्राम्हण विधवांचे बाळंतपण, विधवांचे मूंडन करु नये म्हणुन नाभिकांचा संप, शूद्रांना पाण्यासाठी घरची विहीर खुली करुन देण्याच्या प्रसंगातून फुले दाम्पत्याची कणखर व करारी भुमिका दिसुन येते.

समाज व्यवस्थेवर प्रहार करतांना ह्यमग आमचा धर्म कोणता? हा प्रश्न विचारणारी चिमुरडी मुक्ता साळवे चा सत्कार करतांना मेजर कँडी यांचे, हा निबंध दलित साहित्याची सुरुवात करणारा ठरणार, हे वाक्य बरेच काही सांगुन जाते.

महात्मा फुलेंचा अर्धांगवायुमुळे उजवा हात निकामा होवू नये, डाव्या हाताने लेखन करण्यामागील त्यांची जिद्द व चिकाटी दिसुन येते. त्यांचे महानिर्वाण प्रसंगी सावित्रीबाईंनी पतीच्या चितेला भडाग्नी दिला. ही क्रांतिकारी घटना म्हणावी लागेल.

सावित्रीबाईंनी प्लेगच्या साथीत अनेक रुग्णांचे जीव वाचविले. पण त्यात त्यांचे देहावसान झाले. ह्या प्रसंगातून अंगावर काटे उभे राहिल्याशिवाय राहत नाही. महात्मा फुलेंचे मित्र उस्मान शेख, फातिमा शेख तसेच पुरोगामी ब्राम्हण मित्रांकडुन मिळालेले सहकार्य हे चित्रपटात प्रभावीपणे दाखविण्यात आले आहे.

सहकालाकार म्हणून विनय पाठक, जयेश मोरे, आकांक्षा गाडे, विशाल अर्जून, अभिनव राघव, सुरेश विश्वकर्मा, दर्शिल रुपाली सह सर्वच कलाकारांनी फुले चित्रपटाला न्याय देण्याचे केलेले प्रयत्न हे निश्चितच कौतुकास्पद आहे. साथी - साथी, हर जीवन में हम साथी ह्या गीतासोबतच पोवाडा व इतरही गीत हे श्रवणीय आहेत. महात्मा फुलेंच्या मानसिक गुलामगिरी विरुध्द लढ्याचे वास्तववादी चित्रण अनुभवण्यासाठी मिराज सिनेमा येथे जावुन तो प्रत्येकाने बघण्याची गरज आहे. हे सांगणे न लगे!

■ ■ ■



# जाई आहे एंटीऑक्सीडेंट गुणांनी पुरेपुर

आजच्या काळात एंटीबायोटिक रेसिस्टन्सची समस्या वेगाने वाढत आहे. ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेस तर सर्वसामान्य गोष्ट झाली आहे. इफ्लेमेशनमुळे होणा?या आजाराचा घेरा वाढत आहे. अशात चमेली म्हणजे जाईची फुले एक अनमोल भेट आहे. यात एंटीऑक्सीडेंट क्षमता असून पतंजलीने याचे संशोधन केले आहे

आजच्या काळात माणसाला दोन मोठ्या आरोग्य समस्या निर्माण होत असतात. एक समस्या आहे औषधांच्या प्रति वाढता रेजिस्टन्स आणि दुसरा आहे ऑक्सीडेटिव्ह स्ट्रेस, हा शरीरातील फ्री रेडिकल्समुळे होते. पहीली समस्या ही आहे की अनेक बॅक्टेरिया आणि फंगसमुळे औषधांविरोधात लढणे शिकले आहे. त्यामुळे औषधांचा परीणाम शरीरावर होत नाही.

दुसरीकडे फ्री रेडिकल्समुळे आपल्या शरीरातील पेशींचे नुकसान होत आहे. त्यामुळे वाढत्या वयाने हृदयाचे आजार आणि कॅन्सरसारखे दुर्धर गंभीर आजार वाढले आहेत. या सर्व समस्यांवर सुटका मिळविण्यासाठी एंटीऑक्सीडेंट गरजेचे आहे. एलोपॅथीमध्ये अनेक औषधे आहेत. परंतू जाई फुलांमध्ये ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेसला कमी करतो. यात चांगल्या प्रमाणात एंटीऑक्सीडेंट असते.

संशोधनात उघडकीस आले आहे की आयुवेर्दात उपयोगी ठरलेली चमेलीचे रोपटं एंटीबायोटिक रेजिस्टन्स आणि ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेस दोन्हींशी लढू शकते. दोन्ही समस्यांतून त्यामुळे सुटका होते, चमेलीचे विविध प्रकार आहेत, जे बॅक्टीरिया, फंगस आणि फ्री रेडिकल्सपासून वाचविण्यास मदत करतात. हे औषधी रोपटे सुरक्षित आणि परिणाम कारक औषधांचा स्रोत होऊ शकतात.

या रोपट्यांमध्ये आढळणारी तत्वं टॅनिन्स, अल्कलॉइड्स, फिनोलिक्स आणि फ्लेवोनॉयड्स, बॅक्टीरिया आणि फंगस वर खोलवर परिणाम करतात आणि यांना नियंत्रणात आणतात. यापासून शरीराला होणारे नुकसान कमी आहे.

चमेलीच्या जगभरात सुमारे १९७ प्रजाती आहेत. आयुर्वेदात याचे औषधी गुण देखील महत्वाचे आहेत. चमेलीच्या फुलांचा वापर त्वचा रोग,पिपल्स-पुळ्या, डोळ्यांच्या समस्या बऱ्या होत्यात. त्याच्या पानांचा वापर स्तनाच्या कर्करोगासारख्या आजारांमध्ये तसेच महिलांच्या मासिक पाळीच्या अनियमिततेमध्ये ही उपयुक्त आहेत. चमेलीच्या फुलांचा सुंगध सगळ्यांना आवडतो. चमेलीच्या आयुर्वेदिक औषधी गुण तेवढेच महत्वाचे आहेत.

■ ■ ■

**वाचक लिहितात**

### नंदनवनातील दहशतवादी आग

जिहादी राक्षसांनी काश्मीरात केलेले मृत्यूचे तांडव बघितले. मन सुन्न झाले. पण त्याहीपेक्षा सर्व देशातच प्रचंड संतापाची लाट उसळली. ते दहशतवादी दोन दिवस आधी येऊन राहतात, सैनिकी वेशात येऊन मृत्यूचे तांडव करतात आणि आपल्या गुप्तचर संस्थेला (कइ) सुगावाही लागत नाही. यासारखे सरकारचे भयंकर अपयश ते कोणते? नाकासमोर असलेल्या बांगलादेशात एवढा मोठा उठाव झाला, तेव्हाही भारतीय हेर खाते झोपले होते. का पोसायचे यांना? काश्मीर मधील ३७० कलम हटवले. पण काय फरक पडला? ना तिथे काश्मिरी पंडित जाऊ शकले ना कोणी भारतीय तिथे जाऊन जमीन घेऊ शकले.

मागे पुलवामा घडले आणि आता पहलगाम. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी असलेले सैनिकच मारले जातात तिथे सामान्यांची काय कथा ! सरकार मात्र ठोस कृती करण्यापेक्षा बाता मारण्यात गुंतले आहे. जेवढी तत्परता देशाच्या आणि राज्याच्या निवडणुक प्रसंगी सरकार दाखवते, तेवढी तत्परता आणि सावधानता देशाप्रती दाखवली असती तर हे काश्मिरी हत्याकांड घडले नसते. आता काही दिवसातच अमरनाथ यात्रा आहे. त्यावरही दहशतवादाचे संकट घोंगावत राहणार. आपले परराष्ट्र धोरण अत्यंत खिळखिळे झाले आहे. केवळ परदेश दौरे करणे आणि मिठ्या मारणे म्हणजे परराष्ट्र धोरण नव्हे! त्यासाठी दूरदृष्टी, कणखरपणा, देशाप्रती, जनते प्रति प्रेम, धाडस आणि परिणामांची जाणीव ठेवून निर्णय घ्यावे लागतात.

एकीकडे चीन भारतात घुसतो आहे, तर दुसरीकडे पाकिस्तानचे जिहादी माणसांना मारत आहेत. आता वेळ आली आहे या हिरव्या आणि लाल बावट्यामध्ये भगवा फडकवण्याची ! पण त्यासाठी युद्ध हा एकमेव पर्याय नाही. कारण अविचारी पाकिस्तान अणुबॉम्ब टाकण्यास मागे पुढे पाहणार नाही आणि त्याचे दुष्परिणाम सगळ्यांनाच भोगावे लागतील. त्यासाठी पाकिस्तानची आर्थिक, राजनैतिक आणि पाणी कोंडी करून जगाला आपले म्हणणे पटवून देऊन संपूर्ण दहशतवादी तळांचा नायनाट करायला हवा. अशा परिस्थितीत पाकिस्तान कधीही युद्ध करण्याच्या मनस्थितीत राहणार नाही. दहशतवादाची ही आग इथेच विझवावी लागेल. तेव्हा आता आपली शक्ती आणि युक्ती दाखवायची वेळ आली आहे.

■ **सौ.माधवी पत्की, नागपूर.**

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## कुट निती..

**श्रीकृष्णाच्या कुटनितीचे**
**नेते देतात दाखले**
**मात्र यदा यदाही धर्मस्य**
**हा निस्वार्थ हेतू होता**
**हे कसे विसरले?**

**कुटनिती म्हणून**
**एकमेकांची जिरवण्यात**
**पक्ष आहेत मश्गुल**
**त्यापायी 'बहूजन हितायची'**
**बत्ती झालीय गुल...**

## महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार राज्यातील विविधता आणि समृद्ध वारशाविषयी आपले विचार मांडत आहेत



**मुंबई, २८ एप्रिल :** १ मे रोजी महाराष्ट्र दिन आहे आणि या महान राज्याचा समृद्ध इतिहास, येथील सांस्कृतिक विविधता आणि कला व चित्रपट सृष्टीला या राज्याने दिलेले योगदान यांचे स्मरण करून आनंद साजरा करण्यासाठी राज्यात तयारी सुरू आहे. सोनी सबचे कलाकार- जयेश मोरे, आदिश वैद्य, सायली साळुंखे, सुमित राघवन आणि आदित्य रेडिज सद्भावना व्यक्त करत आहेत आणि त्यांच्या जीवनात या राज्याचे काय महत्त्व आहे, याविषयी सांगत आहेत.

वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, महाराष्ट्र राज्य नेहमी आपला सांस्कृतिक वारसा आणि आधुनिकता यांची सुंदर सांगड घालून आपल्याला प्रेरणा देते. मी मुंबईतच जन्माला आलो आणि मोठा झालो. मला इकडचे पुरणपोळी, श्रीखंड पुरी यांसारखे पारंपरिक पदार्थ खूप आवडतात. सकाळच्या न्याहारीत हे पदार्थ खाऊन मी आख्खे-आख्खे दिवस काढले आहेत. आपण महाराष्ट्र दिन साजरा करत आहोत, तर या राज्याच्या बाणेदारपणाला आणि राज्याचा इतिहास घडवण्यात योगदान देणाऱ्यांना मी सलाम करतो.

वीर हनुमान मालिकेत देवी अंजनीची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, पुण्यातील विशाल किल्ल्यांपासून मुंबईच्या गजबजाटापर्यंत महाराष्ट्र हिंमत आणि महत्त्वाकांक्षेचे प्रतिनिधित्व करतो. या महाराष्ट्र दिनी, मी सर्वांना विनंती करेन की, ज्यामुळे हे राज्य इतके खास बनते, त्या इथल्या लोकांच्या अदम्य उत्साहाचे आपण कौतुक केले पाहिजे.

तेनाली रामा मालिकेत राजा कृष्णदेवरायाची भूमिका करणारा आदित्य रेडिज म्हणतो, ऊर्जावान उत्सवांपासून ते इथल्या लोकांच्या जीवट वृत्तीपर्यंत महाराष्ट्राच्या प्रत्येक पैलूने मला घडवले आहे. या महाराष्ट्र दिनी, मला आजवर भरभरून देणाऱ्या आणि निरंतर प्रेरणा देणाऱ्या हा भूमीला मी वंदन करतो.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दिलीप पटेलची भूमिका करणारा जयेश मोरे म्हणतो, आपल्या राज्याच्या स्थापना दिनी, आपल्या वैभवशाली इतिहासाचे आणि संस्कृतीचे स्मरण करून राज्याने जो विकास केला आहे त्याचा अभिमान बाळगू या. महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत विक्रम सरनची भूमिका करणारा आदिश वैद्य म्हणतो, माझा जन्म मुंबईतला आणि मी इथेच वाढलो. या नगरीचे माझ्यावर खूप ऋण आहे याच नगरीने मला ओळख दिली, प्रेम दिले. आपल्या राज्याच्या वारशाचा आणि राज्याने केलेल्या प्रगतीचा मला खूप अभिमान वाटतो. हा दिवस आपल्याला शांती आणि सामाजिक सद्भावनेचा मार्ग दाखवेल अशी मला आशा वाटते. सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा. जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा!

## ६000+ वंचित मुलांना आणि तरुणांना डिजिटल साक्षरतेमध्ये कौशल्य देण्यासाठी एसुस आणि विद्या इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट फॉर युथ अँड अॅडल्ट्स (विद्या) यांनी हातमिळवणी



**मुंबई, २८ एप्रिल :** तैवानी तंत्रज्ञान ब्रँड एसुसने विद्याच्या सहकार्याने पश्चिम भारतातील दुर्लक्षित भागातील मुले आणि तरुणांसाठी डिजिटल साक्षरता कार्यक्रम सुरू करण्याची घोषणा केली आहे. डिजिटल साक्षरता आणि कौशल्य विकास उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी डिझाइन केलेला हा कार्यक्रम इयत्ता पहिली ते दहावीच्या ६००० हून अधिक विद्यार्थ्यांना तसेच तरुणांना संयुक्त राष्ट्रांच्या डिजिटल साक्षरता फ्रेमवर्कशी जुळवून घेतलेल्या वयानुसार योग्य अभ्यासक्रमाद्वारे परस्परसंवादी आणि प्रकल्प-आधारित शिक्षणाद्वारे आवश्यक कौशल्ये आणि डिजिटल कौशल्ये प्रदान करेल. भागीदारीचा पहिला टप्पा मुंबईत सुरू होईल, त्यानंतर गोवा आणि गुजरातमध्ये.

भारतात प्रवेश केल्यापासून, एसुसने देशात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणण्यासाठी वचनबद्धता दर्शविली आहे. विद्यासोबतची भागीदारी ही एसुस इंडियाने भारतातील डिजिटल दरी भरून काढण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

एसुस इंडिया आणि विद्या भागीदारीमुळे निवडक शाळांमध्ये डिजिटल लॅबच्या स्थापनेद्वारे कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील ५,४८० मुले आणि ६५० तरुणांना थेट फायदा होईल - त्यापैकी बरेच जण पहिल्या पिढीतील शिकणारे आहेत. युनेस्को डिजिटल साक्षरता फ्रेमवर्कशी जुळवून घेतलेल्या साप्ताहिक अभ्यासक्रमाचा वापर करून, विद्यार्थ्यांना संगणकाची मूलतत्त्वे, डिजिटल कथाकथन, पोस्टर डिझाइन, प्रोग्रामिंग (स्क्रॅच, पायथॉन) आणि डिजिटल नीतिमत्तेची ओळख करून दिली जाईल, ज्यामध्ये सर्जनशीलता, सहयोग आणि स्वयं-निर्देशित शिक्षणावर भर दिला जाईल.

तरुणांसाठी, भागीदारी एनआयआयटी फाउंडेशन, नॅसकॉम फ्युचरस्किल्स प्राइम आणि स्किल इंडिया मिशन यासारख्या मान्यताप्राप्त भागीदारांच्या विस्तृत श्रेणीद्वारे प्रमाणित डिजिटल आणि आयटी-सक्षम प्रशिक्षण कार्यक्रम ऑफर करेल. हे अभ्यासक्रम करिअर मार्गदर्शन, इंग्रजी संप्रेषण, नोकरी-तयारी मॉड्यूल आणि शिक्षणापासून रोजगाराकडे संक्रमण सुलभ करण्यासाठी चालू असलेल्या माजी विद्यार्थ्यांना समर्थनाद्वारे पूरक आहेत. हा कार्यक्रम केवळ डिजिटल आणि करिअर कौशल्ये तयार करत नाही तर इंटर्नशिप, नोकरी तयारी प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सपोर्टद्वारे व्यावहारिक मार्ग देखील प्रदान करतो.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना, एसुस इंडियाचे कंट्री हेड एरिक ओयू म्हणाले, एसुसमध्ये, अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्याची आमची वचनबद्धता तंत्रज्ञान प्रदान करण्यापलीकडे जाते, ती म्हणजे ज्यांना त्याची सर्वात जास्त गरज आहे त्यांच्यापर्यंत नवोपक्रम पोहोचवणे. या कार्यक्रमाद्वारे, आम्ही डिजिटल शिक्षणाची मर्यादित उपलब्धता असलेल्या वंचित समुदायातील विद्यार्थी आणि तरुणांना आजच्या जगात महत्त्वाच्या कौशल्यांसह सक्षम करून डिजिटल दरी भरून काढण्याच्या दिशेने एक पाऊल उचलत आहोत. डिजिटल लॅब्स सुसज्ज करून आणि आमच्या उपकरणांद्वारे विद्याचा सिद्ध अभ्यासक्रम सक्षम करून, आम्ही भविष्यासाठी तयार पिढीचा पाया मजबूत करण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

प्रत्येक मुलाला स्वप्न पाहण्याची, शिकण्याची आणि डिजिटल जगात भरभराटीची संधी मिळण्याची संधी मिळायला हवी. एसुस सोबतच्या आमच्या भागीदारीद्वारे, आम्ही हजारो तरुण मनांसाठी दरवाजे उघडत आहोतज्यांपैकी बरेच जण वंचित समुदायातील पहिल्या पिढीतील शिकणारे आहेत. हा उपक्रम केवळ डिजिटल साक्षरतेबद्दल नाही; तो आशा, संधी आणि सक्षमीकरणाबद्दल आहे. भविष्य घडवण्यात आणि प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असलेल्या क्षमतेचे पालनपोषण करण्यात एसुससोबत उभे राहण्याचा आम्हाला अभिमान आहे. रश्मी मिश्रा, संस्थापक अध्यक्षा, विद्या इंडिया म्हणाल्या.

एसुसडिजिटल अॅक्सेसमध्ये गुंतवणूक करत आहे तसेच गरजू विद्यार्थी आणि तरुणांसाठी जीवन बदलणाऱ्या संधी उघडत आहे, उच्च शिक्षण, नोकरीची तयारी आणि उद्याच्या कार्यबलात प्रतिष्ठेचे मार्ग तयार करत आहे. हा कार्यक्रम एसुस इंडियाच्या सामाजिक समता आणि समुदायांमध्ये शाश्वत परिणामासाठी वाढती वचनबद्धता अधोरेखित करतो.

## उफ्फ ... ये लव है मुश्किल या या मालिकेत आशी सिंह वकील कैरी शर्माची भूमिकेत

**मुंबई, २८ एप्रिल :** सोनी सब ही वाहिनी नेहमीच आपल्या प्रेक्षकांसाठी नवीन, आकर्षक आणि हृदयस्पर्शी मालिका घेऊन येत असते. लवकरच या वाहिनीवर लॉन्च होत असलेली उफ्फ ये लव है मुश्किल ... ही मालिका देखील त्याला अपवाद नाही. विनोद, रोमान्स आणि कौटुंबिक नाट्य यांचे मिश्रण असलेली ही मालिका प्रेक्षकांचे लक्ष नक्कीच वेधून घेईल. प्रभावी अभिनय आणि उत्तम स्क्रीन प्रेझेन्सबद्दल ओळखली जाणारी आशी सिंह ही अभिनेत्री या मालिकेत कैरी शर्मा नामक व्यक्तिरेखा साकारणार आहे. कैरी शर्मा एक महत्त्वाकांक्षी आणि होतकरू वकील आहे. कैरी एक खंबीर पण कनवाळू स्वभावाची तरुणी आहे, जी दिल्लीतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढली आहे. लहान वयातच आपल्या तीन धाकट्या भावंडांना वाढवण्याची जबाबदारी तिच्यावर आलेली आहे. पण ती स्वतंत्र स्त्री आहे आणि नैतिक मूल्यांची तिला चाड आहे. आशी या मालिकेत शब्बीर अहलूवालिया साकारत असलेल्या युग या नायकाची नायिका आहे. शब्बीर देखील पहिल्यांदाच आदर्श नसलेली भूमिका करत आहे.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेतील आपल्या भूमिकेविषयी बोलताना आशी सिंह म्हणते, मी जेव्हा कैरीची व्यक्तिरेखा वाचली, तेव्हाच मला हे जाणवले होते की, ही व्यक्तिरेखा पडद्यावर जिवंत करायला आपल्याला आवडेल. आपल्या कुटुंबाचा सांभाळ करण्याची जबाबदारी कैरीवर आहे, तिचे शिक्षण चालू आहे आणि एकीकडे ती पार्ट टाइम नोकरी देखील करत आहे. कायद्याच्या शेवटच्या वर्षात असलेल्या कैरीला वकील व्हायचे आहे. ती योग्य तेच करण्यात मानते आणि कोणाचेही मत ऐकून स्वतःची किंवा इतरांची तिने घेतलेली बाजू ती सोडत नाही, त्यावर ठाम राहते. मला तिचा हा स्वभाव खूप प्रेरणादायक वाटला. मला आणखी एक गोष्ट आवडली, ती म्हणजे या मालिकेच्या मुळाशी असलेली एक गंमतीदार आणि आगळीवेगळी प्रेमकहाणी. एक अभिनेत्री म्हणून मला नेहमी अशा भूमिका करायला आवडतात, ज्या माझ्यातील अभिनेत्रीला मोठे होण्याचा वाव देतात आणि कैरीची भूमिका तशीच आहे.

## 'सोनाटा गोल्ड' अक्षय तृतीयेला सोनाटाने रचली सोन्याच्या भेटवस्तूंची नवी व्याख्या

**नागपूर, २८ एप्रिल :** भारतातील सर्वाधिक पसंतीचा वॉच ब्रँड, सोनाटाने प्रस्तुत केले आहे - 'सोनाटा गोल्ड'. अतिशय स्टायलिश व विचारपूर्वक तयार करण्यात आलेले हे कलेक्शन, सोन्याचा अनुभव घेण्याच्या आपल्या पद्धतीमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणते. फॉर्म आणि फंक्शन यांना एकत्र आणणारे 'सोनाटा गोल्ड' म्हणजे तुम्हाला अतिशय आवडणारे सोने परिधान करण्याचा एक नवा, प्रभावी मार्ग आहे. हे कलेक्शन म्हणजे फक्त परंपरा नाही तर तुमचे स्वतःचे स्टाईल स्टेटमेंट आहे.




अक्षय तृतीया म्हणजे समृद्धी आणि सकारात्मक आरंभाचा शुभ दिवस जवळ येत आहे. या शुभ मुहूर्तावर सोन्याची भेटवस्तू हवी असेल तर 'सोनाटा गोल्ड' हा उत्तम आधुनिक पर्याय आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक घड्याळाचे खास वैशिष्ट्य म्हणजे याच्या डायलमध्ये अस्सल ०.१५ ग्रॅमचे २२ कॅरेटचे तनिष्क सुवर्ण नाणे आहे, या नाण्याचे तेज कारीगरी, वारसा आणि डिझाईन याविषयी बरेच काही सांगते.

अतिशय नजाकतीने घडवण्यात आलेले बारकावे ज्यांना आवडतात त्यांच्यासाठी हे कलेक्शन अगदी योग्य आहे, सुबक केस डिझाईनपासून एम्बेडेड सोन्याचे नाणे असलेल्या लॅकर्ड हाय-पोलिश ब्लॅक डायलच्या विरोधाभासातून उठून दिसणाऱ्या सौंदर्यापर्यंत सर्व काही अतिशय विचारपूर्वक आणि कलात्मक पद्धतीने रचले गेले आहे. अस्सल लेदर स्ट्रॅप लक्षवेधी आणि तरीही भपका नसलेले सौंदर्य प्रदान करतो.

सोनाटाचे ब्रँड हेड श्री प्रतीक गुप्ता यांनी नवीन कलेक्शनविषयी सांगितले, सोनाटा गोल्ड हे फक्त घड्याळ नाही तर एक अनुभव आहे. प्रीमियम, प्रत्येक काळात आवडेल आणि तरीही ट्रेंडमध्ये कायम आघाडीवर राहील असे कलेक्शन आम्हाला तयार करायचे होते. ही घड्याळे अशांसाठी आहेत जे डिझाईनला महत्त्व देतात, सोन्याची सौम्य आणि तरीही प्रभावी अभिव्यक्ती तुमच्यासाठी आणि तुमच्या प्रिय व्यक्तीसाठी.

पुरुष आणि महिलांसाठीच्या दोन शानदार प्रकारांमध्ये उपलब्ध असलेल्या 'सोनाटा गोल्ड' च्या किमती ५६९५ ते ५९९५ रुपयांदरम्यान आहेत. स्वतः स्वतःला दिलेली खास भेट असो, काळ कितीही पुढे गेला तरी कायम आवडत राहील अशी स्टाईल म्हणून केलेली खरेदी असो किंवा तुमच्या प्रिय व्यक्तीसाठी अगदी विचारपूर्वक केलेली कृती म्हणून असो, यंदाच्या सणासुदीच्या काळात 'सोनाटा गोल्ड' ही तुमची सर्वोत्कृष्ट खरेदी ठरेल यात काहीच शंका नाही. www.sonatawatches.in या वेबसाईटवर, अधिकृत डीलर्स, टायटन वर्ल्ड आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर हे नवे कलेक्शन उपलब्ध आहे.

## झी टीव्हीवरील सितारे सन्मान करत आहेत नृत्याच्या तालाचा इंटरनॅशनल डान्स डे च्या निमित्ताने!

**मुंबई, २८ एप्रिल :** २९ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा इंटरनॅशनल डान्स डे हा नृत्याच्या कथा साजरा करतो. नृत्य हा केवळ एक कलेचा प्रकार नसून नृत्याच्या पदलालित्यामध्ये भावनेचाही समावेश असतो. यातून संस्कृती, चैतन्य आणि नाती ही शक्तीशाली पद्धतीने व्यक्त केली जातात. क्लासिकल परफॉर्मन्सेसपासून बिनधास्त ट्रवलर्ससह नृत्यामध्ये व्यक्तीला वर आणण्याची, प्रेरणा देण्याची आणि मनाच्या जखमा भरून काढण्याचीही ताकद असते. यातून नवीन नाती निर्माण होतात आणि एकत्रित तालातून नवे बंध जीवंत होतात. ह्या दिवसाच्या निमित्ताने झी टीव्हीवरील कलाकार कैसे मुझे तुम मिल गयेमधील किशोरी शहाणे, वसुधामधील प्रिया ठाकूर, भाग्यलक्ष्मीमधील मुनिरा कुदरती, जमाई नं.१मधील सिमरन कौर आणि जागृति एक नयी सुबहमधील रचना मिस्त्री ह्या या वैश्विक भाषेच्या सौंदर्याचा सन्मान करत असून नृत्याने त्यांच्या आयुष्याला कशाप्रकारे स्पर्श केला याच्या आठवणी सांगत आहेत.

झी टीव्हीवरील कैसे मुझे तुम मिल गये मधील बबिताच्या भूमिकेतील किशोरी शहाणे म्हणाल्या, माझ्यासाठी नृत्य म्हणजे शिस्त आणि भावना व्यक्त करण्याचे माध्यम आहे. मनोरंजन उद्योगामध्ये काम करायला सुरूवात केल्यापासून नृत्य हा माझ्या दैनंदिन जीवनाचा आणि एक आवडता भाग राहिला आहे. दीर्घ काळापासून नृत्य हा माझ्यासाठी स्ट्रेसबस्टर राहिला आहे आणि कैसे मुझे तुम मिल गयेच्या सेटवरही ब्रेक्समध्ये आम्ही एकत्र येऊन डान्स करतो. त्यामुळे अर्थातच आमच्या चित्रीकरणाच्या दिवसांमध्ये काही मजेदार क्षण निर्माण होतात. नृत्याबद्दल माझी आणखी एक आठवण जोडलेली आहे आणि ती म्हणजे माझ्या मुलासोबत कोरियोग्राफीवर काम करणे. आम्ही आमची आवडती ट्रेंडिंग गाणी निवडतो आणि काही डान्स रूटिन्स बनवतो आणि अर्थातच हा एकत्र घालवलेला वेळ आमच्यातील नाते अधिक दृढ करतो. डान्स ही नेहमीच माझ्यासाठी माझी पॅशन राहिली आहे आणि सोशल मीडियाने मला माझ्या नृत्य कौशल्याचा पाठपुरावा करत राहण्यासाठी खरोखरच प्रेरणा दिली आहे.

झी टीव्हीवरील वसुधा मधील वसुधाच्या भूमिकेतील प्रिया ठाकूर म्हणाली, नृत्याचे माझ्या हृदयात नेहमीच खास स्थान राहिले आहे. काही हिंदी गाणी वाजवून त्यावर नाचणे ही माझ्यासाठी थेरपि आहे आणि जेव्हा कधी माझ्या मनावर ताण येतो येतो तेव्हा हे करून मला चांगले वाटते. ह्यावर्षी झी रिश्ते वॉर्ड्समधील माझा परफॉर्मन्स मला आजही आठवतोय आणि खासकरून माझा सहकलाकार अभिषेकसोबत तो सुरू होण्याआधी मी खूपच नर्व्हस होते. मात्र, जसे संगीत वाजू लागले, ती माझ्या आवडत्या आठवणींपैकी एक बनली.

झी टीव्हीवरील भाग्यलक्ष्मी मधील शालुच्या भूमिकेतील मुनिरा कुदरती म्हणाली, नृत्य हे माझे पहिले आणि मला वाटते आयुष्यभराचे प्रेम आहे. मला आजही आठवतंय की मी लहान असताना माझ्या कमरेला दुपट्टा बांधून आरशासमोर तासन्तास परफॉर्म करत असे. तेव्हा मला वेळेचेही भान राहत नसे आणि मी त्या आनंदात अगदी हरवून जात असे. सराव असो किंवा कार्यशाळा, किंवा दिवसभराच्या कामानंतर निव्वळ माझ्या खोलीमध्ये नाचणे असो, नृत्य कायम माझ्यासोबत असते. ही माझी थेरपि आणि माझे सेलिब्रेशन आहे. मला डान्स व्हिडीओज् चित्रीत करणेही खूप आवडते. सुमारे एक वर्षापूर्वी मी पुनित सरांसोबत पुनित पाठक एक म्युझिक व्हिडीओही चित्रीत केला होता आणि तो अगदी वेगळा अनुभव होता. मला वाटतं नृत्य शिकणे कधी संपूच शकत नाही. प्रत्येक शैली, प्रत्येक शिक्षक, प्रत्येक वर्ग माझ्यातील नवीन काहीतरी बाहेर आणते. मी अनेक शैलींच्या कार्यशाळांमध्ये भाग घेतला आहे क्लासिकल ते कॉन्टेम्परारी ते स्ट्रीट आणि यात मी केवळ तंत्राबद्दल नव्हे तर माझ्याबद्दलही नवीनही काहीतरी शिकले.

झी टीव्हीवरील जमाई नं.१ मधील रिद्धीच्या भूमिकेतील सिमरन कौर म्हणाली, माझ्यासाठी नृत्य हा केवळ कलेचा प्रकार नाहीये तर इथे मला माझी खरी मी सापडते. लहानपणापासूनच जेव्हा मी नृत्य करते तेव्हा मला माझ्यातील जीवंतपणा जाणवतो. मग ते मंचावर असो, वर्गात असो, किंवा माझ्या बेडरूममध्ये. दर वीकेंडला माझ्या आईवडिलांसमोर परफॉर्म करण्याची आठवण आजही मनात आहे. ती जणू आमच्या घरची एक छोटीशी परंपराच बनली होती. मी नवीन गाणे निवडत असे, आठवडाभर त्याचा सराव करत असे आणि मग त्यांच्यासाठी माझा शो परफॉर्म करत असे. त्यांचे हसू आणि प्रोत्साहन जणू मला हळूहळू माझ्या स्वप्नांच्या दिशेनेच पुढे नेत होते. जसजशी मी मोठी झाले, तसतसे नृत्यासोबतच माझे नाते अधिकाधिक वृद्धिंगत होत गेले. आजही मी नृत्याच्या कार्यशाळांमध्ये भाग घेते, नवीन शैली शिकण्याचा प्रयत्न करते आणि नवीन शिकण्यासाठी स्वतःला आव्हान देते. नृत्याने मला शिस्त, समर्पण, सुबकता आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पूर्णपणे उपस्थित राहायला शिकवले.

झी टीव्हीवरील जागृति एक सुबह मधील जागृतिच्या भूमिकेतील रचना मिस्त्री म्हणाली, नृत्य तर माझ्यासोबत अगदी लहानपणापासून आहे. माझ्या आईचा दुपट्टा नेसून आमच्या लिव्हिंग रूमलाच भव्य मंच समजून तिथे मी



ट्रवलिंग करत असे. मला आजही माझा शाळेतील पहिला परफॉर्मन्स आठवतोय. माझे पाय लटपटत होते, हृदयाची धडधड वाढली होती, पण जसे संगीत वाजायला सुरूवात झाली हे सगळे गायब झाले. आजही ती भावना माझ्या मनात आहे. मी एखाद्या भूमिकेची तयारी करत असो, दिवसभराच्या कामानंतर सेटवर आराम करत असो किंवा अगदी मध्यरात्री २ वाजताही संगीतात हरवलेली असो, सगळीकडे नृत्य माझ्या सोबतीला असते. ही केवळ शरीराची हालचाल नव्हे तर ही एक थेरपि, आनंद आणि मला ज्याच्यासोबत हरवून जायला आवडते असे काही आहे. ह्या इंटरनॅशनल डान्स डे च्या निमित्ताने मला दुखावलेला पायाचा अंगठा, नाचून नाचून दुखणारे स्नायू, सरावाच्या वेळेस उडणारे हास्यफवारे आणि ह्या सगळ्या मिडरूटिनमध्ये डोळ्यांत उभे राहिलेल्या अश्रुंचीही आठवण होत आहे.

## आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त कलाकारांनी नृत्याप्रती आपले प्रेम दाखवले!



**मुंबई, २८ एप्रिल :** नृत्य हे आनंद, आवड आणि जीवनाच्या सेलिब्रेशनचे प्रतीक आहे. अनेकजण तंदुरूस्त राहण्यासाठी किंवा भावना व्यक्त करण्यासाठी नृत्य करतात, पण काही कलाकारांसाठी नृत्य हृदयस्पर्शी कनेक्शन आहे, जे त्यांचा उत्साह वाढवते. यंदा आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त टीव्ही कलाकार नृत्याप्रती त्यांची आवड, नृत्यामधून मिळणारा आनंद आणि नृत्य त्यांच्या कलात्मक प्रवासाला कशाप्रकारे आकार देत आहे याबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत नीता मोहिंद्रा (कैलाशा बुआ, 'भीमा'), सपना सिकरवार (बिमलेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मध्ये कैलाशा बुआची भूमिका साकारणाऱ्या नीता मोहिंद्रा म्हणाल्या, ''नृत्यामधून मला आनंद मिळतो, तसेच मी नृत्यामधून माझ्या भावना व्यक्त करते. रंगभूमीपासून टेलिव्हिजनपर्यंत नृत्य माझ्या जीवनातील सातत्यपूर्ण सोबती राहिले आहे. भरतनाट्यम व ओडिसी यांसारख्या शास्त्रीय नृत्यप्रकारांपासून भांगडा व गिड्डाच्या उत्साही बीट्सपर्यंत प्रत्येक स्टाइलने माझ्यामध्ये नृत्याप्रती आवड निर्माण केली आहे. माझ्यासाठी नृत्य एक भावना आहे. मी मंचावर असो किंवा घरामध्ये नृत्य करत असो यामधून मला शांतता, ऊर्जा आणि आपलेपणाची भावना मिळते. मला आनंदी वाटत असेल किंवा अभिव्यक्त व्हायचे असेल तर मी नृत्य करते (हसते).''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये बिमलेशची भूमिका साकारणाऱ्या सपना सिकरवार म्हणाल्या, ''मी नेहमी नृत्य करण्याचा आनंद घेते. अभिनेत्री बनण्यापूर्वी मी कॉलेजमधील इव्हेण्ट्स, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विवाह सोहळ्यांमध्ये कोरिओग्राफी करायची. कथकपासून बॉलिवुडपर्यंत प्रत्येक नृत्यप्रकाराने मला भावना जाणून घेण्यासोबत प्रामाणिकपणे अभिव्यक्त होण्याची शिकवण दिली आहे. मला आजही माझा पहिला सोलो परफॉर्मन्स आठवतो, जेथे मी संगीत, लाइट्स आणि कौतुक यांमध्ये भारावून गेले होते. आजही मला माझे सीन्स कोरिओग्राफ करायला आणि शूटिंगदरम्यान नृत्य करायला आवडते. नृत्यामुळे माझा मूड उत्साहित होतो, धमाल येते, आनंद मिळतो आणि माझ्यामधील परफॉर्मर अधिक निपुण होतो.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अंगूरी भाबीची भूमिका साकारणाऱ्या शुभांगी अत्रे म्हणाल्या, ''मला नृत्य करायला खूप आवडते, ज्यामधून मला खूप आनंद मिळतो. कथक प्रशिक्षणामधून मला मोहकता व शिस्तबद्धतेची, तसेच स्वतःला अभिव्यक्त करण्याची शिकवण मिळाली. मी लावणी, गरबा व बॉलिवुड नृत्य केले आहेत आणि मला ते सर्व आवडतात. कधी-कधी मी आमच्या मालिकेमधील डान्स सीक्वेन्सेसचे कोरिओग्राफ करते आणि यामधून मला अधिक ऊर्जा मिळते. दिवस कितीही व्यस्त व कंटाळवाणा असला तरी काही वेळ नृत्य केल्यानंतर मला आनंद व शांतता मिळते. माझ्यासाठी नृत्य फक्त कौशल्य नाही तर एक भावना, एक ताल आहे, जे माझ्यामध्ये खोलवर रूजलेले आहेत.''



## आज का अंदाज

मंगळवार २९ एप्रिल २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| १२० | ४४६ | १६८ | २७८ | १३८ | १५८ | १६० | १३४ |
| ३०० | २६६ | ३५७ | ४६७ | ३४५ | ३४७ | ३५९ | २६० |
| २२९ | ६९९ | २५८ | ३६८ | ६७९ | २२० | ४५८ | ३५० |
| ३२ | ४२ | ५० | ७० | २० | ४० | ७३ | ८३ |
| ३९ | ४९ | ५१ | ७१ | २९ | ४९ | ७५ | ८५ |
| ३५ | ४५ | ५८ | ७८ | २१ | ४१ | ७६ | ८६ |

**२९ एप्रिल : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ८४ | ९४ |
| २७ | ५७ | ८६ | ९६ |
| २३ | ५३ | ८० | ९० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** तुमचे आरोग्य खूप चांगले राहील. जर तुम्हाला आधीच कोणत्याही गंभीर आजाराने ग्रासले असेल तर आजाराच्या तीव्रतेनुसार उपचार घ्या. पाय दुखण्याची समस्या कायम राहील.

**वृषभ :** आज जास्त ताण घेऊ नका. अन्यथा काही मानसिक आजार होऊ शकतात. कोणत्याही संसर्गजन्य आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तीपासून योग्य अंतर ठेवा. प्रवास करताना अत्यंत सावधगिरी बाळगा.

**मिथुन :** आज तुमचे नशीब तुमच्यासोबत असेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळा सरकारच्या मदतीने दूर होईल. व्यवसायात तुम्हाला तुमच्या वडिलांकडून सहकार्य आणि साथ मिळेल.

**कर्क :** आरोग्याशी संबंधित समस्यांमुळे ताण येऊ शकतो. प्रिय व्यक्तीचा पाठिंबा आणि सहवास तुमच्या मनात उत्साह आणि उत्साह निर्माण करेल. तुमची प्रिय व्यक्ती परदेशातून घरी परतण्याची शक्यता आहे.

**सिंह :** एखादे अपूर्ण राहिलेले महत्वाचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाजयाच्या जवळीकतेचा फायदा तुम्हाला मिळेल. आज मनातील इच्छा नक्की पूर्ण होतील.

**कन्या :** तुम्हाला एखाद्या सरकारी योजनेची जबाबदारी मिळू शकते. समाजात तुमचा मान आणि प्रतिष्ठा वाढेल. नोकरीत पदोन्नतीची शक्यता आहे. वाहन खरेदीची योजना यशस्वी होईल.

**तुळ :** प्रिय व्यक्तीकडून अपेक्षेपेक्षा जास्त पैसे मिळतील. निधीअभावी रखडलेले काम पूर्ण होईल. व्यवसायात जवळच्या मित्राचा सल्ला आणि मदत आर्थिक लाभ देईल. नोकरी मिळाल्याने कुटुंबात आनंद येईल

**वृश्चिक :** बेरोजगारांना रोजगार मिळेल, नोकरीचा शोध पूर्ण होईल. जमीन, इमारत आणि वाहन खरेदी-विक्रीतून आर्थिक लाभ मिळेल. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल.


**धनु :** व्यवसायात उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. कुटुंबात खर्चावरू वाद होण्याची शक्यता आहे. आज तब्येत थोडी नरम राहील. गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना आज रात्री थोडा आराम वाटेल.

**मकर :** आज तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. पैशाशी संबंधित कोणत्याही कामातील अडथळा दूर होईल. व्यवसायात उत्पन्न वाढेल. नवीन प्रेमसंबंधांमध्ये पैसे आणि दागिने मिळण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** आज तुम्हाला आध्यात्मिक कार्यात रस असेल. तुम्हाला जुन्या मित्रासोबत सत्संगाचा आनंद मिळेल. कामाच्या ठिकाणी कनिष्ठ व्यक्तीशी खोल जवळीक निर्माण होईल. तीर्थ यात्रेला जायचा योग आहे.

**मीन :** व्यवसायात नवीन प्रयोग करण्याचा धोका पत्करणे फायदेशीर ठरेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला घराबाहेर जावे लागू शकते. परीक्षेत आणि स्पर्धेत यश मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २०९९




**आडवे शब्द: -**
१) --- -- --- -- -- --- घारे डोळे फिरविते नकटे नाक उडविते एक बालगीत
९) तमाशातील आख्यान
१०) कौतुक
११) कितीही उगाळा काळाअ तो काळाच
१२) हार, सर
१३) मोठेपणा, मान, प्रतिष्ठा
१५) रमापती
१८) त्याच त्याच गोष्टीची कटकट करणारा
२०) विश्व, दुनिया
२२) दूध
२३) फणसाचा एक प्रकार
२५) गेरू
२७) खात्री करणे
२८) फळाचे साल
२९अ) नक्की, खात्रीने
३१) हत्ती
३३) जिन्याच्या पायरीला लावलेले लाकूड
३५) काया
३७) मत्स्य
३९) यमनगरी
४०) दुष्ट स्त्री, सटवाई
४२) त्रास
४४) थडगे
४५) धपाटा
४६) अनेक प्रकार
४८) शाळेतील गुरुजी
५०) मऊ
५२) विविध
५३) कावळा
५४) गावाची हद्द
५५) घट्ट बासुंदी
५७) आंब्याची बी
५९) पावा
६०) वल्लरी
६२) दृष्टी
६३) वाळवंट
६६) अशक्त, दुर्बळ
६८) ह्या वर्षी
६९) पर्ण
७०) चांगला
७१) अरण्य
७२) वरवधू
७३) खरकट्याची प्रचंड रास

**उभे शब्द :-**
१) भूमितीतील तीन कोनांची नावे
२) नवसाने प्राप्त झालेला
३) तपास, शोध
४) मूर्ख
५) भास्कराचार्यांचा गणितावरील ग्रंथ
६) मोडलेला
७) हत्तीचे ओरडणे
८) वरपांगी
१२) मनुष्यजात
१४) चांदी
१६) पाठोपाठ
१७) माल पुरवठा
१९) वकिलाचे काम
२१) गोलमटोल
२४) कट्टा, ओटा
२६) चंद्र
२७) विशेष
२९) फळा, पाटी
२९अ) हिरवा (हिं)
३०) मीठाची चव
३२) हिशोबाची एक बाजू
३४) खोड्या करणारा
३६) जिव्हा
३८) दक्ष
४०) अंदाजाने, सरासरीने
४१) वीरगती
४३) लता मंगेशकर यांच्या वडिलांचे नाव
४४) शिर, डोके
४७) च्या शिवाय
४९) एक सुगंधी वनस्पती
५१) जन्मदाता
५४) बैलाच्या नाकात ओवलेली दोरी
५६) ढवळण्याचे एक छोटे साधन
५८) नवरा
५९) पोते
६१) श्रीमंत
६४) खोदकान
६५) पोलिसांना बातमी पुरविणारा
६७) मोठी लाकडी पेटी
६९) पारद

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



प्रति,
मा. माणिकराव कोकाटे साहेब,
कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महाशय,

बऱ्याच दिवसांपासून तुमची आणि आमची भेटच व्हायला तयार नाही. एक तर तुम्ही मुंबई किंवा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असतात. नाशिकला किंवा सोमठाण्याला आला तर सर्वसामान्य जनता तुमच्या अवतीभवती असताना आमच्यासारख्या तुमच्यावर प्रेम करणाऱ्या मित्रांना तुम्हाला त्रास होऊ नये म्हणून आम्ही दूर अंतरावरून हाय हॅलो करीत राहतो. तसे आमचे तुमच्याकडे काहीच काम नाही. पण एक मात्र नक्की की, तुमच्याशी काहीतरी सल्लावजा निवांत बोलले पाहिजे असे वाटते. पण संपूर्ण राज्याचा कारभार पाहत असताना आम्ही तशी अपेक्षा ठेवणे गैर ठरेल. असो, मध्यंतरी तुम्ही शेतकऱ्यांच्या संदर्भात दोन-तीन वाक्ये बोललात. त्यावरून महाराष्ट्रात वादळ उठले होते. त्याच संदर्भात आम्हाला बोलायचे होते. कारण तुम्ही नको तितके खरे बोलतात. म्हणूनच सल्ला द्यावासा वाटतो की, तुम्ही खोटे बोलायला केव्हा शिकाल? तुमचे एकही वाक्य असत्य नव्हते. त्यात खरेपणा ठासून भरला होता. परंतु तुमच्या हितचिंतकांनी (?) तोडफोड करून वाक्य इकडची तिकडे करून तुम्हाला बदनाम करायचा प्रयत्न केला. नाशिक जिल्ह्यातील तुमचे दोन-तीन हितचिंतक पत्रकार नेहमीप्रमाणे कामाला लागले होते. त्यांनी संधीचं सोनं करण्याचा प्रयत्न केला. तुम्ही देखील नेहमीप्रमाणे त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे काही काळ तुम्हाला त्रास जरूर झाला. अर्थात मनात काहीही पाप नसल्यामुळे तुम्ही बिनधास्त होते. हा तुमचा स्वभावच. पण या पत्राच्या निमित्ताने तुम्हाला आम्ही 'खोटं कसं बोलायचं' याची अनेक उदाहरणे सांगणार आहोत. त्याचा तुम्हाला मंत्रिपदावरच्या राजकीय वाटचालीस फायदा होईल. तुमच्यावर संकट कोसळल्यावर आम्ही तुमचे समर्थक मित्र अस्वस्थ होतो व एकमेकाला फोन करून 'असं कसं झालं' अशी एकमेकाला विचारणा करतो. तुम्हाला खोटं आवडत नाही. 'एक वेळ मी राजकारण सोडेल, पण सत्याची कास सोडणार नाही' हे तुमचं ब्रीद वाक्य. याच तुमच्या स्वभावामुळे गेल्या पाच-सहा टर्म पासून जनतेने तुमच्यावर कमालीचा विश्वास ठेवला आहे. अजितदादांनी तुमच्या या गुणाची पारख करून तुम्हाला कृषी खात्याचे कॅबिनेट मंत्री पद दिले. त्यामुळे अवघा नाशिक जिल्हा आनंदाने न्हावून निघाला होता. गेल्या काही दिवसांपासून पायाला भिंगरी लावून संपूर्ण राज्याचा दौरा करून तुम्ही शेतकऱ्यांना आधार देत आहात. पण हे सर्व करताना आता तुम्हाला पटो ना पटो, पण खोटं खोटं बोलावं लागणार आहे. राज्यातील तीन पक्षांचे सरकार असताना, प्रत्येक जण काय काय खोटं बोलतात याची उदाहरणे दिल्यानंतर कदाचित तुम्हाला ते पटेलही. पण बघा स्वभावाला मुरड घालून तुम्हाला खोटं बोलण्यासाठी आम्ही सर्वजण तुम्हाला काही टिप्स देत आहोत. त्याचा वापर करता आला तर इतरांप्रमाणे तुमच्या डोक्याला त्रास होणार नाही.

# माणिकराव, कृपया खोटं बोलायला शिका ना!






महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून काय काय योजना आणाव्या व त्यांना सुखी समाधानी कसे जगता येईल, यासाठी अलीकडे आपण सकाळी सकाळी उठून कामाला लागल्याचे तुमचे मतदारच सांगतात. पण या सर्व काही गर्दीत आता तुम्हाला फेकाफेकी करावी लागणार आहे. एकेकाळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषविलेल्या व सध्या खासदार म्हणून आपल्या मतदारसंघात गुमान गप्प बसलेल्या नारायण राणेंचे उदाहरण बघा बरं. त्यांनी आपल्या एका पोराला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात घुसविले व दररोज खोटं खोटं कसं बोलायचं असं शिकविलेले दिसते. त्यामुळे ते चक्क मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतले मंत्री बनून गेले. जे कधी 'कणकवली सम्राट' होऊ शकले नाही, 'कोकण सम्राट' होऊ शकले नाही, पण अलीकडे ते बेगडी का होईना 'हिंदुहृदय सम्राटा'च्या रांगेत जाऊन बसू पाहताय. गोमुत्राला कधी स्पर्शही न केलेले नितेश राणे सायंकाळच्या 'बैठकीत' गोमूत्र प्राशन करू लागले. हे आम्ही नाही दस्तुरखुद्द राणेच सांगतात. खरं खोटं शोधायला कोण जातं? एवढेच नव्हे तर मशिदीत घुसून मारायची व मुसलमानांच्या दुकानातून काही खरेदी करायचे नाही, असा सल्ला ते देतात. अर्थात संध्याकाळच्या जेवणामध्ये जे काही सामिष भोजन ते घेतात, ते कुठून आणतात याच्याशी आपल्याला काय देणे घेणे? एकेकाळी 'हाफ चड्डी'वाल्यांची एलर्जी असलेले राणे आता 'हाफ चड्डी'च काय, लंगोट घालायला देखील तयार होतील. याला म्हणतात तडजोड. ही तडजोड करायला कोकाटे साहेब आपण शिकलेच पाहिजे.

त्यामुळे तुमचेही बरे चालेल आणि आमचेही बरं चालेल. एवढेच नव्हे तर कोणीतरी बाप कुठल्यातरी बंगल्यावर बसला असल्या कारणाने आपण कोणाला घाबरत नाही, असे नितेश राणेंनी एकदा सांगितले होते. त्यामुळे भरघोस द्वेषपूर्ण भाषणे करूनही त्यांच्यावर कुठलीही कायदेशीर कारवाई झाली का? त्यांच्याकडे बघा बरं, द्वेष पसरवण्याची दिलेली जबाबदारी ते प्रामाणिकपणे पार पाडत असले, त्यांना त्यात यश अजिबात येताना दिसंत नाहीये. हे तुम्ही सार्वजनिक रित्या जरी मान्य करत नसलात तरीही खाजगीत तरी हे मान्यचं करावे लागेल. तेच तेच विषय आणि त्याच विषयांवरून वारंवार तोंडावर पडावे लागत असल्याने, लोकांना आता राणेंचं 'नको नको' झालं आहे. 'लोक भाजपला मत देतात याचा अर्थ ते भाजपच्या द्वेषाला समर्थन करतात असे नाही' हे समजायला काही काळ जाणारच. तरीही ते बिनधास्त आहे. कारण खोटं बोलायचं स्पर्धेत ते प्रचंड आघाडीवर गेले आहेत. 'भाजपला मत देऊ नका, तुम्हाला बिरोबाची शपथ' अशी शपथ देणारे गोपीचंद पडळकर भाजपच्या सावलीत जाऊन बसलेच ना? सध्या अडगळीत गेलेले एकेकाळचे फ्रंटफूटवर असलेले माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी देखील शिवसेनेतून बाहेर पडताना 'हिंदुत्वा'साठी आम्ही बाहेर पडलो, असे सांगितले होतेच ना? त्यावेळी अवघा महाराष्ट्र पोट धरून हसला होता. पण खोटं बोलून त्यांनी रेटून नेलेच होते ना! एवढेच कशाला 'समते'साठी संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर संघर्ष करणारे छगन भुजबळ भाजपच्या नेतृत्वाखाली 'समते'चा संघर्ष करीतच आहे ना! तसं पाहिलं तर हा फार मोठा विनोद आहे, पण ते त्यांची भूमिका प्रामाणिकपणे पार पाडतातच ना! मग तुम्हालाही त्यांच्या सगळ्या प्रमाणे वागायला काय हरकत आहे? नाशिकला पालकमंत्री अद्याप नेमलेला नाही. परंतु मीच पालकमंत्री आहे अशा जोशात नाशिकला मंत्री गिरीश महाजन पालकमंत्री पदाच्या भूमिकेत शिरतातच ना! नाशिककरांना ते हवे की नाही याचा विचार ते करतात तरी का? मुख्यमंत्री देखील नाशिककारांच्या भावनांचा विचार करतात का? पण नकली का होईना 'संकट मोचक' म्हणून बिरूदावली मिरवून ते फिरतात की नाही? काश्मीरला संकटात सापडलेल्या पर्यटकांना ते घ्यायला गेले होते की फिरायला, हे त्यांच्या देहबोलीतून संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. तरीपण अडचणीत आलेल्यांनाच मी सोडवायला गेलो होतो ही त्यांची भूमिका खरी की खोटी? आम्हाला तुमच्याकडून अशीच भूमिका अपेक्षित आहे. विदर्भातील एक आमदार तुमच्या सारखेच स्पष्टवक्ते व परखड. संजय गायकवाड हे त्यांचे नाव. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील पोलिसांइतके भ्रष्ट पोलीस जगात कुठेच नाही. 50 लाखाचा माल पकडला तर पंचनाम्यात 50 हजारच दाखवतात, आता बोला! एवढं खरं बोललं तरी शेवटी त्यांना माफी मागावीच लागली ना! तेही तुमच्याच पठडीतले. जे काही मनात आहे तेच ओठावर. खरं म्हणजे संजय गायकवाड काय आणि तुम्ही काय, दोघेही खऱ्या अर्थाने हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंचेच वारसदार शोभतात. कोकाटे साहेब, आपल्याला अजून खूप मोठी मजल मारायची आहे. त्यासाठी तुम्हाला ओठावर आलेले सत्य काही काळ दाबून ठेवावेच लागणार आहे. जितकं रिटर्न खोटं बोलता येईल, तेवढे अलीकडच्या काळात योग्य ठरेल.

**– आपले हितचिंतक (खरोखरचे)**
**समस्त नाशिककर**

## महाभारतात देखील खोटे बोलल्याचा इतिहास

महाभारतात अश्वत्थामा मेला असे धृष्टद्युम्न किंवा काही आवृत्त्यांमध्ये भीमसेन यांनी म्हटल्याचे उल्लेख आढळतो. पण मुख्यतः कथा अशी आहे की, युधिष्ठिर जो सत्यवचनी म्हणून प्रसिद्ध होता. याने थोडेसे खरे आणि थोडेसे खोटे सांगून द्रोणाचार्यांना भ्रमित केले होते. घटना अशी घडली होती की, द्रोणाचार्य युद्धात शत्रूंना प्रचंड त्रास देत होते. त्यांना मारणे अत्यावश्यक होते. त्यासाठी कृष्णाने युधिष्ठिराला सांगितले की, अश्वत्थामा मेला आहे असे सांग. प्रत्यक्षात भीमाने एक हत्ती मारला ज्याचे नाव होते "अश्वत्थामा". मग युधिष्ठिराने मोठ्याने सांगितले, "अश्वत्थामा मेला आहे" आणि खालच्या आवाजात म्हणाला "हत्ती", म्हणजे खरे सांगितले पण अपूर्ण आणि संमिश्र सत्य. हे ऐकून द्रोणाचार्यांनी शस्त्र खाली टाकले आणि नंतर धृष्टद्युम्नाने त्यांचा वध केला. थोडक्यात युधिष्ठिराने "अश्वत्थामा मेला" असे म्हटले पण ते अर्धसत्य होते. प्रत्यक्षात द्रोणाचार्यांच्या मृत्यूचे मुख्य कारण हेच वक्तव्य झाले. एखाद्या गोष्टीतून हित निर्माण होणार असेल, तर खोटं बोलले तर त्याला क्षमा असते, असा इतिहास आहे. मुंबई बॉम्बस्फोटाच्या वेळी शरद पवारांनी एक खोटे विधान करून मुंबईच्या धार्मिक दंगलीला एक वेगळे वळण देऊन शांतता प्रस्थापित केली होती दस्तूर खुद्द पवारांनीच एका मुलाखतीत आपण ते जाणून-बुजून खोटं बोललो होतो, कारण मला हिंदू मुस्लिम दंगल टाळायची होती. मुस्लिम वस्तीत देखील अतिरेक्यांनी बॉम्ब ठेवले होते, हे त्यांनी खोटे बोलून दंगल थोपविली होती. मग माणिकराव आता खोटं खोटं बोलायची प्रॅक्टिस तुम्हाला करावीच लागेल!

## सुप्त शत्रू बाराही महिने आहे जागे!

नको तितके खरे बोलल्यामुळे माणिकराव संकटात सापडतात. त्याचा फायदा त्यांचे नेहमीचे शत्रू उचलल्याशिवाय राहतात का? साधं उदाहरण घेऊया! कधीतरी तीस चाळीस वर्षांपूर्वीची सदनिकेची केस उकरून ती न्यायालयाच्या समोर आणून तुम्हाला गोत्यात आणायचा प्रयत्न केलाच ना! ज्यांनी गोत्यात आणायचा प्रयत्न केला, त्यांची सार्वजनिक प्रतिमा काय आहे, याचे स्पष्टीकरण तुम्ही कधीही दिले नाही. मुळातच अनेक गुन्हेगारी वृत्तीच्या माणसांनीच तुम्हाला गोत्यात आणायचा प्रयत्न केला होता. पण त्या संदर्भात एखादी पत्रकार परिषद घेऊन ही माणसं कोण आहे? याचा खुलासा तुम्ही करणे गरजेचे होते. ज्यांच्यावर अनेक केसेस दाखल आहेत, ज्यांनी अनेकांना फसविले आहे, त्यांच्या बाबतची माहिती समाजाला तुम्ही देणे गरजेचे होते. पण त्या ऐवजी आपण न्यायालयीन प्रक्रियेत गुंतून पडले. नाशिक व सिन्नरकरांचे तुमच्या मंत्रीपदाचे स्वप्न पूर्ण झाल्यानंतर तुम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न काहींनी करून पाहिला. परंतु एक मात्र नक्की की, आपण नेहमी 'खरे' असल्यामुळे त्यातून सहीसलामत बाहेर पडलात. पण याचा अर्थ तुमचा शत्रू झोपलेला नाही. तो बाराही महिने जागा आहे. म्हणूनच तुमच्याकडून नको तितके खरे बोलल्यानंतर त्या संधीचे तो सोने करेल. म्हणूनच सर्वांना खुश करण्यासाठी तुम्हाला खोटं खोटं बोलावं लागेल. त्यासाठी मंत्रिमंडळात जनतेला खुश करण्यासाठी खोटे बोलणारे अनेकजण आहेत. त्यांचा अनुभव देखील दीर्घ आहे. त्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यायला काय हरकत आहे?

## ➤ महत्त्वाचे

### पेठ तहसील कार्यालयात आढावा बैठक संपन्न

**नाशिक ।** पेठ तालुक्यात पाणी टंचाई जाणवणाऱ्या गावातील टंचाई निवारण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संवेदनशील राहावे.



पाणीटंचाईचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, अशा सूचना राज्याचे अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिल्या. पेठ तालुक्यातील पाणी टंचाईबाबत मंत्री श्री. झिरवाळ यांनी आज दुपारी तहसील कार्यालयात आढावा बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दिंडोरीचे उपविभागीय अधिकारी आप्पासाहेब शिंदे, गटविकास अधिकारी श्री. सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, सरपंच, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. झिरवाळ यांनी सांगितले की, पेठ तालुक्यातील काही गावांना एप्रिल, मे या दोन महिन्यांत पाणीटंचाईची जाणवते. टंचाई निवारणार्थ सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. वीज वितरण कंपनीने पाणीपुरवठा योजनांना तातडीने वीज जोडणी द्यावी. टंचाई काळात पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडित करू नये. जलजीवन मिशन अंतर्गत साकारण्यात येणाऱ्या पाणी योजनांच्या कामांना गती द्यावी, असेही निर्देश त्यांनी दिले.

## आजचा वाढदिवस



**श्रीमती लिलाबाई रा. देशमुख**
**नवीन आडगांव नाका, पंचवटी, नाशिक**

# दरोड्याच्या तयारीचा कट उधळला; उपनगर पोलिसांची धडक कारवाई




**नाशिक ।** उपनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने देवळाली गाव परिसरात दरोड्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारांवर कारवाई करत मोठा कट उधळून लावला. सहायक पोलीस निरीक्षक शांताराम महाजन, पोहवा विनोद लखन, पोशि पंकज कर्पे, पोशि सौरभ लोंढे व पोशि संदेश रगतवान यांच्या गस्त पथकाने ही कारवाई केली. पोलिसांच्या गस्तीदरम्यान संशयित हालचाली दिसल्याने पाठलाग करण्यात आला. आरोपी सार्थक आहीरे, पवन घोलप व समीर सोनवणे यांना पकडण्यात आले. सार्थक आहीरे याच्या पायाला गावठी कट्ट्यातून गोळी लागली. अटक केलेल्या आरोपींकडून गावठी कट्टा, धारदार कोयता, दोरी, मिरची पुड आणि दोन मोटारसायकली असा एकूण २ लाख ५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उप आयुक्त डॉ. मोनिका राऊत, सहायक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि जितेंद्र सपकाळे, पोनि संजीव फुलपगारे (गुन्हे), सपोनि शांताराम महाजन, पोउनि प्रभाकर सोनवणे व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोउनि प्रभाकर सोनवणे करीत आहेत.

# नासाका विद्यालयात भरला 'संस्कारवर्ग!'




**नासाका विद्यालयातील संस्कार वर्गात विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक प्रा.राजेश्वर शेळके, कवी शरद आडके, कामगार नेते प्रशांत कापसे, मुख्याध्यापक अरुण पगार, संयोजक रवींद्र मालुंजकर, कैलास लहांगे आदी.**

**नाशिकरोड ।** आपले कुटुंब आणि शाळा यांच्याकडून झालेले विविधांगी संस्कार आयुष्यभरासाठी दिशादर्शक असतात. योग आणि व्यायामासह श्लोक, वळणदार हस्ताक्षर यांतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारा 'संस्कारवर्ग' सलग तिसऱ्या वर्षी नासाका विद्यालयात भरला!

पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात आयोजित या संस्कार वर्गात तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.राजेश्वर शेळके यांनी व्यायामाचे प्रकार आणि गरज, श्लोक, सुंदर हस्ताक्षर, मातापित्यांसह गुरूंचे महत्त्व याबद्दल हसत-खेळत मार्गदर्शन केले. मधल्या सुट्टीत सर्वांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला.

मुख्याध्यापक अरुण पगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या समारोप सत्रास श्रीमंतश्री नर्सरीचे संचालक कवी शरद आडके, ज्येष्ठ कामगार नेते प्रशांत कापसे मंचावर उपस्थित होते.

शाळेतील संस्काराची शिदोरी आयुष्यभर पुरते. संस्कारांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने ग्रामीण भागात अशा संस्कार वर्गांची खऱ्या अर्थाने गरज आहे. अशा संस्कार शिबिरांतून मिळणारी शिदोरी जीवनात महत्त्वपूर्ण असते, असे विचार पाहुण्यांनी मांडले. मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांसह इतर सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. निवडक विद्यार्थ्यांनी अनुभवकथन केले. मुख्याध्यापक अरुण पगार यांनी स्वागत केले. संयोजक रवींद्र मालुंजकर यांनी प्रास्ताविक केले. सांस्कृतिक विभागप्रमुख कैलास लहांगे यांनी आभार मानले.

# गोवंश जातीच्या जनावरांची सुटका; दोन आरोपी अटकेत

## गुंडाविरोधी पथकाची कारवाई

**नाशिक ।** शहर पोलिसांच्या गुंडाविरोधी पथकाने मोठी कारवाई करत गोवंश जातीच्या ६ जिवंत जनावरांची कसायाच्या तावडीतून सुटका केली आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. शहरात गोवंश जातीच्या जनावरांची वाहतूक आणि कत्तल थांबविण्यासाठी सर्व पोलिसांना आदेश दिले होते. त्यानुसार, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव आणि सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली गुंडाविरोधी पथकाला कारवाईचे आदेश देण्यात आले होते.



दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गिरणारे गावातून गंगापूरमार्गे नाशिक शहरात गोवंश जनावरे आणली जाणार होती. ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून, पथकाने भोसला मिलिटरी स्कूलसमोर, गंगापूर रोड येथे सापळा रचला.त्यानंतर थोड्याच वेळात बोलेरो पिकअप ( एमएच १५ एफवी ९७२४) वाहन आल्याचे दिसून आले. वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यात ६ जिवंत गोवंश जातीची जनावरे आढळून आली. वाहन चालक नामदेव सुकदेव पावडे (वय ४२, रा. पिंपळद) आणि त्याचा साथीदार अरकान उर्फ अप्पु अजीज कुरेशी (वय २४, रा. मदीना नगर, नाशिक) यांना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत त्यांनी जनावरे गिरणारे परिसरातील मोकळ्या जागेतून भरून सादीक नगर, वडाळागाव येथील निसार कुरेशीच्या गोडाउनमध्ये कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींकडून एकूण ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी आरोपींना गंगापूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई गुंडाविरोधी पथकाचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते, मलंग गुंजाळ, विजय सुर्यवंशी, प्रदीप ठाकरे, भूषण सोनवणे, अक्षय गांगुर्डे, राजेश राठोड, कल्पेश जाधव, प्रविण चव्हाण, अशोक आघाव यांनी पार पडली.

# युवा मानस



## अडचण येणार नाही

मॅच मेकिंग

[illegible]

## कारकुनी करणारा न्यायाधीश झाला

अचिव्हर

[illegible]



## फंडू एसएमएस

[illegible]

टेक अपडेट्स



[illegible]

## फिरायला जाताय?

भटकंती







[illegible]

टेक टॉक



[illegible]

## परदेशातून वैद्यकीय शिक्षण?

करिअर ग्रोथ



[illegible]

स्मार्ट शॉपिंग



[illegible]

## अशा 'टोप्या' घाला

फॅशन पॅशन



[illegible]

टेक अपडेट्स



[illegible]

## ...पण धावत राहा

फिटनेस फंडा



[illegible]



# सेन्सेक्स, निफ्टीमध्ये जोरदार तेजी
## बाजार बंद होताना हजार अंकांची वाढ



**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

भारत आणि पाकिस्तानदरम्यान वाढता भू-राजकीय तणाव असतानाही कार्पोरेट कंपन्यांची मजबूत कमाई आणि परदेशी गुंतवणुकीचा ओघ कायम राहिल्याने सोमवारी भारतीय शेअर बाजाराने मोठी तेजी दर्शवली. आजच्या सत्रात सेन्सेक्स आणि निफ्टी प्रत्येकी १.२ टक्के वाढले.

सेन्सेक्स १,००५ अंकांनी वाढून ८०,२१८ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक २८९ अंकांच्या वाढीसह २४,३२८ वर स्थिरावला. आयटी वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक तेजीसह बंद झाले. मेटल, रियल्टी, ऑईल अँड गॅस, फार्मा, पीएसयू बँक १ ते ३ टक्क्यांनी वाढले.

चौथ्या तिमाहीत अंदाजापेक्षा अधिक नफा नोंदवल्यानंतर रिलायन्सचा शेअर्स सेन्सेक्सवर तब्बल ५.२ टक्के वाढला. त्याचबरोबर सन फार्मा, टाटा स्टील, एसबीआय, ॲक्सिस बँक, एम अँड एम, टाटा मोटर्स, एलटी, आयसीआयसीआय बँक, अदानी पोर्ट्स, मारुती, एनटीपीसी, कोटक बँक हे शेअर्स १ ते ३ टक्के वाढले. तर एचसीएल टेक, अल्ट्राटेक सिमेंट, हिंदुस्तान युनिलिव्हर हे शेअर्स घसरले.

**सेन्सेक्स 80,218**

**निफ्टी 24,328**

रिलायन्स आणि महिंद्रा अँड महिंद्रा व्यतिरिक्त, एसबीआय आणि आयसीआयसीआय बँकेच्या शेअर्समध्ये १ ते २ टक्क्यांची वाढ दिसून आली. दुसरीकडे, एचसीएल टेक, नेस्ले इंडिया, मारुती सुझुकी, एशियन पेंट्स आणि अल्ट्राटेक सिमेंट हे घसरले होते. देशातील सर्वात मौल्यवान कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीजचे शेअर्स सुरुवातीच्या व्यवहारात ३.३% वाढून बीएसईवर १,३४३ रुपयांवर पोहोचले. त्यानंतर शेअर्सने आणखी मोठी उसळी घेतली.

रिलायन्स कंपनीच्या चौथ्या तिमाहीच्या निकालांनंतर शेअरच्या किमतीत वाढ झाली. कंपनीने मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत १९,४०७ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. हा नफा गेल्या वर्षीपेक्षा २% जास्त आहे. बाजार तज्ज्ञांनी १८,४७१ कोटी रुपयांचा नफा होण्याचा अंदाज वर्तवला होता. कंपनीने अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली. तसेच रिलायन्स इंडस्ट्रीजने आपल्या भागधारकांसाठी ५.५० रुपयांचा लाभांशही जाहीर केला आहे,

# नागपूरच्या भोसले घराण्याची ऐतिहासिक तलवार न्यूयॉर्कमध्ये लिलावासाठी?

**नागपूर, दि. २८ प्रतिनिधी**

नागपुरातील प्रसिद्ध भोसले घराण्याची ऐतिहासिक तलवार सध्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आहे. ही तलवार न्यूयॉर्कमधील एका ब्रोकर कंपनीच्या मालकीत असून ती लवकरच ऑनलाईन लिलावासाठी आणण्यात येणार आहे अशी माहिती 'सदबीज' या लिलाव करणाऱ्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. या तलवारीला भोसले घराण्याशी जोडले जात असून, खास करून श्रीमंत राजे रघुजी भोसले यांच्याशी संबंध असल्याचा दावा कंपनीकडून करण्यात येत आहे.

ही तलवार कशी आणि कधी न्यूयॉर्कच्या त्या ब्रोकर कंपनीकडे पोहोचली आहे, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. या तलवारीच्या इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी अनेक इतिहासकार आणि नागपूरमधील भोसले घराण्याचे




वंशज उत्सुक आहेत. ही तलवार म्हणजे केवळ एक शस्त्र नसून भोसले राजवंशाच्या सामर्थ्याची आणि शौर्याची साक्ष आहे.

इतिहासात १८५३ ते १८६४ या काळात नागपूरच्या राजे मुधोजी भोसले यांनी इंग्रजांविरुद्ध अनेक युद्धे लढली होती. या काळात इंग्रजांनी नागपूरचा खजिना लुटल्याचे इतिहासात नमूद आहे. या लुटमारीत या तलवारीचा काहीसा संबंध असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कदाचित ब्रिटिशांनी लुटलेल्या खजिन्यासोबत तलवारही नेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

राजे मुधोजी भोसले यांच्या वंशजांनी आणि इतिहासतज्ज्ञांनी या तलवारीच्या लिलावाला विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ही तलवार भोसले घराण्याची मौल्यवान वारसा असून ती भारतातच सुरक्षित ठेवली पाहिजे. तलवार लिलावासाठी बाजारात येणे म्हणजे राजवटीच्या इतिहासाला धक्का असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.

या तलवारीच्या लिलावाच्या पार्श्वभूमीवर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषत: ती न्यूयॉर्कमध्ये कशी पोहोचली याचा शोध घेण्याची गरज आहे. भारतीय इतिहासातील महत्त्वपूर्ण या तलवारीचे भारताकडे पुनर्वसन होणे आवश्यक आहे, असा इतिहासप्रेमींचे म्हणणे आहे.

भोसले घराण्याच्या इतिहासात या तलवारीला विशेष महत्त्वाचा स्थान आहे. त्यामुळे या तलवारीच्या लिलावाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागपूरमधील संस्कृती आणि इतिहासावर आधारित ही तलवार एक अद्वितीय वारसा मानली जाते.

शेवटी, भोसले घराण्याच्या या ऐतिहासिक तलवारीसंबंधित सर्व तपशील योग्य न्यायालयीन मार्गाने आणि शासनाच्या हस्तक्षेपाने उलगडले जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे, जेणेकरून हा मौल्यवान इतिहास सुरक्षित राहू शकेल आणि पुढील पिढ्यांना त्याचा आदर राहील.

# औद्योगिक विकासाला चालना; सुसज्ज कन्व्हेंशन सेंटर उभारणार - मुख्यमंत्री

**छ. संभाजीनगर, दि.२८ प्रतिनिधी**

औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये सुसज्ज व पुरेशी जागा असलेले औद्योगिक प्रदर्शन व सुविधा केंद्र (इंडस्ट्रियल एक्झिबिशन कम कन्व्हेन्शन सेंटर) उभारण्यात येईल. शेंद्रा आणि बिडकीनला जोडणारा इंडस्ट्रियल रिंगरोड तयार करुन, ईव्ही (इलेक्ट्रिक वाहन) क्लस्टरसाठी 5 एकर जागा देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. औद्योगिक प्रदर्शन व सुविधा केंद्र उभारतांता व्यवहार्य तूट भरुन काढण्यासाठी शासन निधी देईल, असे श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

एमआयटी महाविद्यालयात चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर तर्फे आयोजित 'उद्योग पुरस्कार 2025' च्या वितरणप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण आणि अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, विशेष आमंत्रित पाहुणे एन्ड्यूरन्स टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय




संचालक अनुराग जैन, सीएमआयचे अध्यक्ष अर्पित सावे, सचिव अथर्वेशराज नंदावत, सीएमआयचे माजी अध्यक्ष राम भोगले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्याचे पुढचे मॅन्युफॅक्चरिंग मॅग्नेट छत्रपती संभाजीनगर -जालना आहे. औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये सुसज्ज व पुरेशी जागा असलेले इंडस्ट्रियल एक्झिबिशन कम कन्व्हेन्शन सेंटर (औद्योगिक प्रदर्शन व सुविधा केंद्र) उभारण्यात येईल. हे केंद्र चालविण्यासाठी अनुभवी संस्थेस दिले जाईल. त्यातील व्यवहार्य तूट शासन निधी देऊन भरुन काढेल. केंद्र सरकारच्या सहकार्याने औद्योगिक वसाहतीतील उड्डाणपूल उभारण्याची योजना आहे. तसेच, चाळीसगाव - संभाजीनगर रेल्वे बोगद्यासाठी राज्य शासन पाठपुरावा करणार असून, भूसंपादनाची कार्यवाही केली जाईल.

**जायकवाडी धरणावर सौर ऊर्जा प्रकल्प**

श्री. फडणवीस म्हणाले की, जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्मितीसाठीही विविध प्रकल्प आणले जात आहेत. त्यात प्रामुख्याने देशातील सर्वात मोठा फ्लोटिंग सोलर प्रकल्प जायकवाडी धरणावर उभारण्यात येणार आहे. काही परवानग्या मिळाल्या असून, उर्वरित परवानग्या मिळाल्यानंतर काम सुरू होईल. दिल्ली-मुंबई (डीएमआयसी) कॉरीडॉरसाठी आवश्यक पायाभूत सुविधा येथे तयार करण्यात आल्या आहेत. यामाध्यमातून देशातील पहिली स्मार्ट इंडस्ट्रियल सिटीही छत्रपती संभाजीनगरमध्ये उभारण्यात आली आहे. आता या कॅरिडॉरमध्ये आता जागा शिल्लक नसून आता आणखी ८ हजार एकर जमीनीचे संपादन करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. संपूर्ण देशात ईव्ही (इलेक्ट्रिक वाहन) उत्पादनात मोठा हिस्सा छत्रपती संभाजीनगरचा असणार आहे. येथील ईव्ही क्लस्टरच्या विकासाला चालना दिली जाणार आहे.

**पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यात वळविणार**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीसाठी पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प शासन राबविणार आहे. ५० टीएमसी पाणी विविध प्रकल्पांद्वारे मराठवाड्यात आणण्यात येईल. यामाध्यमातून संपूर्ण मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होणार आहे. याशिवाय, कोल्हापूर व सांगलीतील अतिवृष्टीच्या आलेल्या पुराचे ३०टीएमसी पाणी उजनीच्या माध्यमातून मराठवाड्याकडे वळविण्याची योजना जागतिक बँकेच्या सहकार्याने तयार करण्यात आली आहे. त्यांनी सांगितले की, नागपूरहून गोवापर्यंत असलेला शक्तिपीठ महामार्ग हा मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमधून जाणार असून हा महामार्ग मराठवाड्यातील उद्योगांसाठी जीवन वाहिनी ठरणार आहे. शक्तिपीठ महामार्गामुळे मराठवाड्यातील पर्यटन व धार्मिक स्थळांना तसेच उद्योगांना चालना मिळेल. जेएनपीटी पोर्टच्या तीनपट मोठे बंदर वाढवण येथे उभारण्यात येत आहे. या पोर्टला नाशिक येथे जोडण्यात येणार असून यामुळे छत्रपती संभाजीनगरहून या वाढवण पोर्टला सहा ते आठ तासात मालवाहू कंटेनर पोहचणार आहेत. याचा मोठा फायदा निर्यातदार उद्योगांना होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# भंडाऱ्यात बोलेरो-ट्रेलरची धडक
## चार ठार, एक गंभीर जखमी

**भंडारा, दि. २८ प्रतिनिधी**

येथील राष्ट्रीय महामार्गावरील साई प्रसाद हॉटेलसमोर रविवारी रात्री भीषण अपघात घडला. यामध्ये बोलेरो कार आणि ट्रेलरची समोरासमोर धडक झाली. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला.

या अपघातात मृतांमध्ये अशोक फुलचंद देहरवाल (४८ वर्षे, नागपूर), शैलेंद्र लेखाराम बघेल (३४ वर्षे, खापरी, नागपूर), शैलेश पन्नालाल गोकुळपुरे (४० वर्षे, एअरफोर्स नगर), मुकेश बिंजेवार (३२ वर्षे, वाडी, नागपूर) यांचा समावेश आहे.

दरम्यान, अपघातात जखमी झालेल्या अविनाश नकाटोडे यांच्यावर भंडारा सरकारी रुग्णालयाच्या



आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. अविनाश हा ड्रायव्हर होता, असे सांगितले जात आहे. या दुर्दैवी अपघातामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत गुन्हा दाखल केला आणि पुढील तपास सुरू केला.

# तुमच्या ताटातील तांदूळ बनावट तर नाही ना?
## पोलिसांनी पकडला 62 लाखांचा बनावट तांदूळ

**अहिल्यानगर, दि. २८ प्रतिनिधी**

एमआयडीसी परिसरात बासमती तांदळाच्या नावाखाली बनावट तांदूळ तयार करून विक्री केला जात असल्याच्या प्रकाराचा अन्न व औषध प्रशासनाने भांडाफोड केला. सुमारे 62 लाख रूपये किमतीचा तांदूळ जप्त करण्यात आला आहे. सदर बनावट तांदळाचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. ते प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाकडून सांगण्यात आले.

एमआयडीसी परिसरात बासमती तांदळाच्या नावाखाली बनावट तांदूळ तयार करून विक्री केला जात असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीनंतर एमआयडीसीतील मे. खुशी इंडस्ट्री या आस्थापनाच्या गोदामावर छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान साध्या तांदळावर रासायनिक पावडर फवारून कृत्रिम सुगंध व बासमतीचा भास निर्माण करण्यात येत असल्याचे आढळून आले. नंतर या बनावट तांदळाचे 'खुशी गोल्ड' ब्रँडच्या बॅगांमध्ये आकर्षक पॅकिंग करून विक्रीसाठी तयार ठेवण्यात येत होते.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकार्यांनी घटनास्थळी साठवलेला तांदूळ व वापरण्यात येणारी रासायनिक पावडर ताब्यात घेतली आहे. एकूण जप्त केलेल्या बनावट बासमती तांदळाची किंमत तब्बल 62 लाख रूपये असल्याचे अधिकार्यांनी सांगितले. तांदळाचे नमुने अधिक तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. खुशी इंडस्ट्रीच्या मालकाचे अहिल्यानगर शहरातील दाळमंडई परिसरातही दुकान असल्याचे निष्पन्न झाले आहे. या दुकानातून बनावट बासमती तांदळाची विक्री केली जात असल्याचा संशय असून, यासंबंधीही चौकशी सुरू आहे.

ही कारवाई शुक्रवारी रात्री सहाय्यक आयुक्त सोपान इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी राजेश बडे, नमुना सहाय्यक सागर शेवंते व शुभम भस्मे यांनी केली. या प्रकरणाचा तपास अन्न सुरक्षा अधिकारी बडे करीत आहेत.


# मानसिक आरोग्याची गुरुकिल्ली

**लोकारोग्य**

संत तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे. ''मन करा रे प्रसन्न,सर्व सिद्धीचे कारण'' अर्थात आपलं मन जर प्रसन्न,आनंदी असेल तर सर्व गोष्टी व्यवस्थित होतात. परंतु होत काय कि, आपण जीवन जगत असताना आपल्या प्रत्येकाला अनेकदा बऱ्या वाईट अनुभवांना सामोरं जावं लागत.अनेक प्रकारचे ताण तणाव आपल्याला असतात. आपली जीवनशैली देखील अत्यंत धकाधकीची आणि तणावयुक्त बनलेली आहे. याचा दुष्परिणाम हा आपल्या मनावर होत असतो. अर्थात, आपल्याला ताप,सर्दी,पडसे असे जे शारीरिक आजार होतात तसेच मनावरचा ताण जर वाढला तर अनेकदा अनेक प्रकारच्या मानसिक आजाराच्या समस्या उद्भवतात.,आणि मनुष्य मनोविकारी बनू शकतो.म्हणूनच आपण प्रत्येकाने आपलं मानसिक आरोग्य जपणं,सुधृढ ठेवणं अत्यंत गरजेचं आहे. मुळात मानसिक आरोग्य म्हणजे काय?आणि मानसिक आरोग्य सुधृढ ठेवण्याची गुरुकिल्ली नेमकी कोणती?हेच जाणून घेण्यासाठी नागपूरच्या प्रादेशिक मनोरुग्णालयात मानसोपचारतज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. दीपक अवचट यांच्याशी केलेली बातचीत.

**१]मानसिक आरोग्य म्हणजे नेमकं काय?**

मानसिक आरोग्य म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी अगोदर आपण आरोग्य म्हणजे काय हे समजून घेणं महत्वाचं आहे. मानवी शरीर आहे या शरीराच्या काही गरज आहेत. आपण रोज आहार घेतो,व्यायाम करतो,आपलं मन आनंदी ठेवण्यासाठी मनोरंजनात आपलं मन गुंतवतो,एकमेकांशी संवाद साधतो या सर्व गोष्टीमुळे आपलं शारीरिक आरोग्य सुधृढ राहण्यास मदत होते. परंतु जस शारीरिक आरोग्य असत तसेच मानसिक आणि सामाजिक आरोग्य देखील असत. आपल्याला ताप,सर्दी,खोकला झाला किंवा पायाला हाताला इजा झाली,पोटात काही गडबड असेल तर आपलं शारीरिक आरोग्य बिघडलं असं आपण म्हणतो परंतु काही कारणामुळे आपल्याला जर मानसिक तणाव आला,जीवनात खूप नैराश्य आलं तर त्याचा आपल्या मनावर जो परिणाम होतो त्याला



मानसिक आजार म्हणतात. अर्थात मानसिक आजार हे मानसिक आरोग्य बिघडवतात.

**२] एखाद्या व्यक्तीच मानसिक आरोग्य उत्तम आहे हे कस ओळखायचं?**

सर्वसाधारण माणसं हि आनंदाने आपलं आयुष्य जगत असतात. त्यांची विचारधारा हि सशक्त असते आणि विचार देखील सकारात्मक असतात. जीवनातील छोट्यामोठ्या समस्यांचा सामना करण्याची आणि त्या समस्यांवर तोडगा काढण्याची त्यांची क्षमता असते, असे लोक मानसिक दृष्ट्या सक्षम असतात.परंतु एखादी व्यक्ती अनेक दिवस उदास असेल, एकटीच बडबडत असेल,चारचौघांमध्ये मिसळत नसेल,अशा व्यक्तीला झोप येत नसेल ,काही भास होत असतील तर अशा व्यक्तीची मानसिक स्थिती बिघडलेली आहे असं म्हणता येईल. अनेकदा हि अवस्था जर अनेक आठवडे राहिली तर प्रचंड नैराश्य येऊन अशा व्यक्तीला मानसिक विकार देखील जडतात. मानसिक आजार हे ओळखता येत नाहीत ते समजून घेणं महत्वाचं असत.

**हॅलो डॉक्टर**

**३]मानसिक आजाराचे प्रकार कोणते आहेत?**

मानसिक आरोग्य आणि मानसिक आजार या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एखादा मनुष्य सर्वसाधारण असतो जो जीवनातील समस्यांचा सामना करू शकतो त्याच मानसिक आरोग्य हे उत्तम आहे असं म्हणता येईल. परंतु एखादी व्यक्ती हि काही दिवसापेक्षा अनेक दिवस जर नैराश्यात असेल, त्याच्या मनात सातत्याने नकारात्मक विचार नयेत असतील,त्याला इतरांशी बोलावंसं वाटत नसेल,चारचौघात मिसळावं असं वाटत नसेल तर ती व्यक्ती मानसिक दृष्टया आजारी असते. मनाचे स्क्रिझोफिनिया,डिफेंशिया ,बायपोला डिसऑर्डर,डिप्रेशन असे अनेक आजार आहेत. या पैकी स्किझोफोर्निया मध्ये एखाद्या व्यक्तीला लोक आपल्याबद्दल बोलतायत,कुजबुज करतायत,आपल्याला हसतायत असे भास होतात हि गोष्ट सहा महिने असेल तर तो स्क्रिझोफोर्निया आहे असं म्हणता येईल. एखाद्या मोठ्या आघातामुळे किंवा मनावर सातत्याने येणाऱ्या तणावामुळे मनुष्य एकांतात जातो,खूप एकटा वागतो,त्याला कसलीच इच्छा होत नाही ते नैराश्य असते.

**४]आपलं मानसिक आरोग्य सुधृढ राखण्यासाठी उपाय काय आहेत?**

आपल्या मनाच आरोग्य चांगलं,स्वस्थ राखण हि अगदी सोपी गोष्ट आहे त्यासाठी फार काही वेगळं करणं गरजेचं नाही. आपला आहार आपण वेळेवर घेणं आणि आपल्या आहारात शरीरासाठी पोषक सर्व घटकांचा समावेश असेल असा आहार घेणं महत्वाचं आहे. शिवाय रोजच्या रोज व्यायाम करणं,वाचन,संगीत एकणं,किंवा असाच एखादा मनाला विरंगुळा मिळेल असा छंद जोपासणं महत्वाचं असत. समाजातील इतर लोकांमध्ये मिसळणं,आपल्या मित्रांचा एक ग्रुप करून त्यांच्याशी संवाद साधन,व्यक्त होणं आपल्या समस्या शेअर करणं हे मनाच्या आरोग्यसाठी खूप महत्वाचं आहे. मानसिक लवचिकता वाढवणं देखील तितकच महत्वाचं आहे. सतत सकारात्मक वृत्तीने जगता आलं पाहिजे. अशा गोष्टीमुळे मन प्रसन्न राहत आणि मानसिक आजारांचा त्रास न होता आपलं मानसिक आरोग्य सुधृढ राहत.

## कर्करोग उपचारात ॲबव्हीने व्हेनेटोक्लॅक्सच्या माध्यमातून भारतात वाढवली व्याप्ती

**जनआरोग्य**

ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया (एएमएल) या दुर्मिळ आणि गतिशील रक्त कर्करोगाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठीच्या जागतिक मोहिमेअंतर्गत आज जागतिक एएमएल जागरूकता दिन साजरा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर, परिवर्तन घडवणारी औषधे निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या जागतिक बायोफार्मास्युटिकल क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲबव्ही ने भारतात कर्करोग उपचार क्षेत्रात पदार्पण करण्याची घोषणा केली आहे. कंपनीने ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया आणि क्रॉनिक लिम्फोसाइटिक ल्युकेमिया या दोन्ही प्रकारच्या कर्करोगांवर उपचारासाठी व्हेनेटोक्लॅक्स हे औषध तयार केले आहे. कर्करोगाविरुद्धच्या भारताच्या लढाईत आवश्यक असलेल्या वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी आणि रुग्णांच्या जीवनात सुधारणा घडवण्यासाठीच्या ॲबव्ही च्या समर्पण भावनेचे हे महत्त्वपूर्ण पाऊल प्रतीक आहे.

ॲक्युट मायलॉइड ल्युकेमिया हा एक वेगाने पसरणारा रक्त आणि अस्थिमज्जाचा कर्करोग आहे. यात उपचार पर्याय मर्यादित असतात आणि रुग्णांच्या जगण्याची शक्यता कमी असते. व्हेनेटोक्लॅक्स हे बीसीएल-२ इनहिबिटर औषधांच्या श्रेणीतील पहिले औषध आहे. हे रक्त आणि अस्थिमज्जातील कर्करोगाच्या पेशींना निवडकपणे लक्ष्य करून एक नवीन उपचार पद्धती देते. विशेषतः वय किंवा इतर आरोग्य समस्यांमुळे पारंपरिक तीव्र केमोथेरपी घेऊ शकत नसलेल्या रुग्णांसाठी हे आशेचा किरण ठरते.नवी दिल्लीच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या (AIIMS) अलीकडील आकडेवारीनुसार, भारतात एएमएलचे प्रमाण दर १,००,००० लोकसंख्येमध्ये २.५ रुग्ण इतके आहे. एएमएल असलेल्या रुग्णांसाठी, विशेषत: जे तीव्र केमोथेरपीसाठी सक्षम नाहीत, त्यांच्यासाठी उपचाराच्या अधिक संधी उपलब्ध करण्याची तीव्र गरज दिसून येते.

## पपईच्या बियांचे फायदे

पपईच्या बिया केवळ आरोग्यासाठीच नाही तर त्वचेसाठीही फायदेशीर असतात. त्यांचे मर्यादित प्रमाणात सेवन केल्याने आपले आरोग्य चांगले राहते शिवाय सौंदर्यातही भर पडते. पपई आपल्या आरोग्यासाठी किती चांगली असते. पपई खाण्याचे अनेक फायदे असतात. पण तुम्हाला कदाचित हे माहित नसेल की पपईच्या बियासुद्धा तेवढ्याच आरोग्यवर्धक असतात. पपईमध्ये औषधी गुणधर्म असतात ज्यामुळे आपल्या शरीरातील असंख्य समस्या मुळापासून नष्ट होण्यासाठी मदत करतात.ज्या व्यक्तींना आपले वजन कमी करायचे आहे अशा व्यक्तींना पपईसोबतच पपईच्या बियांचाही वापर केला जातो. आपण या बियांना सुकवून ठेवू शकतो आणि त्याची पावडर बनवून सुद्धा विविध पदार्थांसोबत त्याचे सेवन करू शकतो.ज्या व्यक्तींना शुगरची समस्या आहे, तसेच पचनासंबंधीची समस्या असेल यावर सुद्धा या बिया अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याचबरोबर पपईच्या बिया शरीरामध्ये कॅन्सर पेशींची वाढ होण्यापासून सुद्धा रोखतात.ज्यांना पचनासंबधी किंवा बद्धकोष्ठताची समस्या असेल. त्यांच्यासाठी तर पपईच्या बिया या रामबाण उपाय असतात. तीन ते चार बियांचे सेवन केल्यास तर बद्धकोष्टतेची समस्या लवकरच दूर होते. जर एखाद्या व्यक्तीला चिकनगुनिया, मलेरिया, डेंगू यासारखे आजार झाले असतील तर अशा वेळीसुद्धा पपई खाण्याचा सल्ला दिला जातो व त्याचबरोबर पपईच्या पानांचा रस प्यायल्याने व्यक्तीच्या शरीरातील प्लेटलेट्सची संख्या वाढण्यास मदत होते. तसेच जर तुमचे पोट साफ होत नसेल, पोटामध्ये गॅस निर्माण झाला असेल तर कच्च्या पपईची भाजी सुद्धा बनवून तुम्ही खाऊ शकता किंवा पपईच्या बियांचेही सेवन करू शकता.सौंदर्यप्रसाधने मध्ये सुद्धा पपईचा खूप मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# विधानसभा निवडणुकीत काँग्रेस शहराध्यक्षाची मला मदत- सुरेश खाडे

**मिरज, दि. २८ प्रतिनिधी**

मिरजेत विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे शहराध्यक्ष व माजी नगरसेवक संजय मेंढे यांनी आपला पक्ष बाजूला सोडून मला मदत केली, असा गौप्यस्फोट भाजपचे आमदार सुरेश खाडे यांनी केला. मिरज पॅटर्नमुळेच विजयाचे गणित साकारले गेल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मिरजेत संजय मेंढे यांच्या प्रभागात ओढ्यावरील संरक्षण भिंतीच्या कामासाठी खाडे यांनी निधी मंजूर केला आहे. त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलताना खाडे यांनी विधानसभा निवडणुकीत मेंढे यांनी मदत केल्याचा गौप्यस्फोट केला. ते म्हणाले, मी खरे बोलतो त्यामुळे सर्वांना समाधान वाटते. त्यात वावगे काहीच नाही. बापू हे भाऊबरोबर असावेत असे सर्वांनाच वाटते. खाडे यांच्या वक्तव्यावर संजय मेंढे यांनी काहीही मत मांडले नाही. यावेळी सुरेश आवटी, करण जामदार, बबिता मेंढे उपस्थित होते. याबाबत विचारणा केल्यानंतर संजय मेंढे म्हणाले, आ.खाडे बोलले म्हणून आम्ही त्यांचे काम केले असे होत नाही. यापूर्वीही आ.खाडे यांनी विरोधी उमेदवार मीच निवडतो, असे सांगितले होते. माझा व त्यांचा पक्ष वेगळा आहे, मी त्यांना निवडणुकीत मदत केली या दाव्यात तथ्य नाही.

शिवसेनेचे उमेदवार तानाजी सातपुते म्हणाले, आमची निवडणुकीत काँग्रेससोबत युती असल्याने काही बोलता आले नाही. मी त्यांच्यावर विश्वास ठेवला होता. या नेत्यांनी मला मदत केली नसली तरीही जनतेने सहकार्य केले असल्याचेही त्यांनी सांगितले.

# पाकिस्तानला तुर्कीची रसद!
## बायरकतार ड्रोनसह सहा विमाने भरून शस्त्रास्त्रे कराचीला पोहोचली



**कराची, दि. २८ वृत्तसंस्था**

भारताने कितीही मदत केली तरी तुर्कस्तान हा पाकिस्तानच्याच बाजुने उभा ठाकला आहे. भारताविरोधात लढण्यासाठी तुर्कीने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर लष्करी शस्त्रसामुग्री पाठविली आहे. तुर्कीच्या लष्कराचे एअर फोर्स सी १३० हे मालवाहू हर्क्युलिस विमान रविवारी कराची विमानतळावर उतरले आहे.

या विमानामध्ये तुर्कीचा धोकादायक ड्रोन बायरकतार आणि अन्य शस्त्रास्त्रे आहेत. भारताविरोधात लढण्यासाठी तुर्की पाकिस्तानला मोठी लष्करी मदत करत आहे. या दोन्ही देशांनी एकमेकांना लष्करी मदत करण्याचे आश्वासन दिले होते. यानुसार ही मदत केली जात आहे.

तुर्कीने एक-दोन नव्हे तर सहा मालवाहू विमाने पाकिस्तानला पाठविली आहेत. ही विमाने इस्लामाबाद विमानतळावरही उतरविण्यात आली आहेत. तुर्कीच्या मदतीने पाकिस्तान भारताला एलओसीवर टक्कर देणार आहे. पाकिस्तानी आणि तुर्कीच्या सुत्रांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे पाठविण्यात आल्याचे सांगितले आहे. परंतू, त्यात काय काय आहे हे मात्र त्यांना सांगितलेले नाही.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर आणि काश्मीरवरून भारत-पाकिस्तान संघर्षानंतर, तुर्की पाकिस्तानच्या पाठीशी उभा राहिला आहे. वेळोवेळी तुर्कीने पाकिस्तानची बाजू घेतलेली आहे. तरीही भारत नेहमी तुर्कीची मदत करत आला आहे. तुर्की, पाकिस्तान आणि चीनमधील वाढत्या संरक्षण संबंधांवर यामुळे प्रकाश टाकला गेला आहे. पाकिस्तान या दोन देशांच्या जिवावरच भारतासोबत युद्धाची खुमखुमी बाळगून आहे.

पाकिस्तान हवाई दलाने (पीएएफ) पेन्सी, स्कार्दू आणि स्वात या प्रमुख हवाई तळांना सक्रिय केले आहे. यावर अमेरिकेने दहशतवादाविरोधात लढण्यासाठी दिलेली एफ-१६, जे-१० आणि जेएफ-१७ लढाऊ विमाने तैनात करण्यात आली आहेत.

# एनसीईआरटीच्या पाठ्य पुस्तकांतून मुघल, दिल्ली सल्तनतचे संदर्भ हटविले

**नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था**

इयत्ता सातवीच्या एनसीईआरटीच्या पाठ्य पुस्तकांमधून मुघल आणि दिल्ली सल्तनत यांचे सर्व संदर्भ काढून टाकण्यात आले आहेत. तर, भारतीय राजघराणे, महाकुंभचे संदर्भ, 'मेक इन इंडिया' आणि 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या सरकारी उपक्रमांचा समावेश नवीन अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

या आठवड्यात प्रसिद्ध झालेली नवीन पाठ्य पुस्तके नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) आणि शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रमाची रुपरेखा (एनसीएफएसई) २०२३ च्या अनुरूप तयार करण्यात आली आहेत. ज्यामध्ये शालेय शिक्षणात भारतीय परंपरा, ज्ञान प्रणाली व स्थानिक संदर्भ समाविष्ट करण्यावर भर दिला आहे.

एनसीईआरटीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा पुस्तकांचा दुसरा भाग येत्या काही महिन्यांत अपेक्षित आहे. तथापि, त्यांनी वगळलेले भाग पुस्तकाच्या दुसऱ्या भागात कायम ठेवले जातील की नाही यावर भाष्य केले नाही.

एनसीईआरटीने यापूर्वी मुघल आणि दिल्ली सल्तनतवरील धडे छोटे केले होते. सामाजिक विज्ञान पाठ्य पुस्तकात मगध, मौर्य, शुंग आणि सातवाहन यासारख्या प्राचीन भारतीय राजघराण्यांवर नवीन प्रकरणे आहेत.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com